दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२९१ | मंगळवार,दि.२४ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-291 | Tuesday, Dt.24 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# स्थानिक निवडणुका ४ टप्प्यांत?

## ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पहिल्या टप्प्याचे मतदान?

मुंबई : प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे पडघम वाजायला सुरुवात झाली असून, राज्य सरकार, निवडणूक आयोगाने तशी तयारी सुरू केली आहे. त्यानुसार राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यात होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, पहिला टप्पा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पार पडेल, असे सांगितले जात आहे.

महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका या वेगवेगळ्या होणार असल्याची माहिती समोर येत आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रभाग रचनेचे काम सुरू आहे. निवडणूक आयोगाकडून लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेळापत्रक जारी केले जाण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोग त्यासाठीच तयारी करत आहे. असे असले तरी निवडणूक आयोग ४ टप्प्यांत निवडणुका घेणार असल्याचे जाहीर करण्यात आलेले नाही. याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. निवडणूक आयोगाकडून याबाबत अधिकृत घोषणा केल्यानंतरही सर्व स्पष्ट होईल. पण याबाबत सध्या जोरदार चर्चा सुरू आहेत.

राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक महत्त्वाच्या शहरांत, जिल्ह्यांत पडद्यामागे प्रचंड राजकीय घडामोडी सुरु आहेत. महायुती असेल किंवा महाविकास आघाडी, प्रत्येक पक्ष कामाला लागले आहेत. निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. त्यामुळे निवडणुकीसाठी रणनीती आखली जात आहे. यासाठी युती की



आघाडीत निवडणूक लढायची? याबाबतही प्रत्येक पक्षात विचारमंथन होत आहे. त्यातून काय निर्णय घेतला जातो ते आगामी काळात स्पष्ट होईलच. या दरम्यान आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत महत्त्वाची अपडेट समोर येत आहे.

राज्यातील अनेक महापालिकांमध्ये २, ३ तर काही ठिकाणी ५ वर्षांपासून प्रशासनाकडून कारभार चालवला जातो. निवडणुका न झाल्याने तिथे सध्या प्रशासनाच्या अख्यत्यारित कामकाज सुरू आहे. आधी कोरोना संकट, यानंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून सुप्रीम कोर्टात सुरू असलेली सुनावणीमुळे निवडणुकांना विलंब झाला. मात्र, आता सुप्रीम कोर्टाने निवडणुका घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत.

## शेतकऱ्यांना पीक कर्ज नाकारल्यास शाखा अधिकार्‍यांच्या तोंडाला काळे फासु- जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

प्रतिनिधी @ बीड

बीडमधील स्टेट बँक ऑफ इंडिया च्या मुख्य शाखेमध्ये शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने 'बँकेची शाळा' आंदोलन सोमवार दिनांक २३ जून २०२५ रोजी करण्यात आले.पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायकजी राऊत, संपर्कनेते सुनिलजी प्रभू , महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे साहेब व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली




तसेच शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील बँक ऑफ इंडियाच्या जालना रोड बीड येथील मुख्य शाखेमध्ये आंदोलन करण्यात आले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्ह्यातील पक्षाच्या वतीने बँकांची शाळा हा उपक्रम राबविण्यात आला यावेळी संबंधित शाखेच्या शाखा व्यवस्थापक यांना आत्तापर्यंत किती शेतकऱ्यांना कर्ज दिले आहेत, किती अर्ज आले आहेत, शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड का केले आहे. सिबिल का मागितले जाते असे अनेक प्रश्न विचारले व सविस्तर माहिती घेतली.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कुठल्याही कामासाठी तुम्ही अडवणुक करु नका जर शेतकऱ्यांना आडवले तर शिवसेना बीड जिल्ह्याच्या वतीने आम्ही बँकांचे कामकाज होऊ देणार नाहीत आणि पीक कर्ज देण्यास नकार दिल्यास शाखेत जाऊन शाखा

(उर्वरीत पान २ वर)

## चोरीस गेलेले साडे दहा लाखाचे दागिने फिर्यादीस केले परत

प्रतिनिधी @ बीड

पोलीस ठाणे बीड शहर येथे चोरीचा गुन्हा दाखल झाला होता आणि त्यामध्ये डॉक्टर लक्ष्मीकांत तांदळे यांचे घरातून दागिने चोरी गेले होते.. बीड शहर पोलिसांकडून चोराचा शोध होऊन त्याला अटक करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आज दिनांक २३ जून रोजी चोरीस गेलेले सर्व सोन्याचे दागिने मुद्देमाल हा मुळ मालकास परत करण्यात आला आहे. यावेळी डॉक्टर लक्ष्मीकांत तांदळे यांनी आभार व्यक्त केले .पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉंवत यांच्या या कार्यपद्धतीमुळे नागरिकांमध्ये विश्वास वाढीस लागला आहे.पोलिस अधीक्षक श्री. नवनीत



कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचीन पांडकर, शितलकुमार बल्लाळ, सहा.पोलीस निरीक्षक-बाबा राठोड व पोलिस अंमलदार बालाजी मुळे यांचे उपस्थितीत सोन्याचे दागिने फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्यात आले.

## माथाडी कायद्याचे प्रश्नात लक्ष घालणार

## मा. शरद पवारांचे डॉ.बाबा आढावांना आश्वासन

प्रतिनिधी @ मुंबई

जगात नावाजला जात असलेला व हमाल कष्टकऱ्यांच्या जीवन रेखा असलेल्या माथाडी कायद्याचे प्रश्नात मी लक्ष घालेन, असे आश्वासन मा. शरद पवार यांनी डॉ. बाबा आढाव यांना दिले. पुणे येथील मोती बाग येथील कार्यालयात डॉ. बाबा आढाव यांनी महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे शिष्टमंडळासह , मा.शरद पवारांची भेट घेतले, त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले. माथाडी कायद्यामुळे, हमालासारख्या हातावर पोट असणाऱ्या अंगमेहनती कष्टकऱ्यांना, नोकरीची नियमन व शाश्वती, जीवनातील स्थैर्य, सामाजिक सुरक्षा आणि जनमानसात सन्मान प्राप्त झाला. तसेच या कायद्याचे



स्थापनेत व अंमलबजावणीत आपलाही सिंहाचा वाटा असल्याचे बाबांनी सांगितले.स्थानिक पातळीवर निर्माण होणारे तंटे मिटविण्यासाठी, मालक - कामगार प्रतिनिधी असणारे माथाडी मंडळ सक्षम असून, गेले १५-२० वर्षापासून ही मंडळ च सरकारने थोपवून धरल्याने, स्थानिक पातळीवर मालक व कामगारांची भयंकर अशी कुचंबणा होत असल्याचे बाबांनी पवारांचे निदर्शनास आणून दिले.या कायद्याला जाणीवपूर्वक

(उर्वरीत पान २ वर)



दिंद्रुड : टकारवाडी येथील रेशीम शेती उद्योजक छाया शिवराज फाटे यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नवकल्पनाची अंमलबजावणी, शाश्वत व पर्यावरण पूरक शेतीचा अवलंब व शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी कार्य याबाबत 'राष्ट्रऋषी नानाजी देशमुख आदर्श शेतकरी पुरस्काराने' दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र,अंबाजोगाई च्या वतीने सोमवारी सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी राज्यसभा सदस्य खा.अजित गोपछडे यांचे प्रमुख उपस्थिती होती.

## कोल्हापूरच्या संजय गुरवांची आयुर्वेदिक औषधी ठरतेय दृष्टीदोष धारकांसाठी संजीवनी

अंबाजोगाई / सुनिल सिरसाट

कोल्हापूर येथील गुरव परिवाराची आयुर्वेदिक औषधी डोळ्यांचा आजार-विकार असणाऱ्या दृष्टीदोष धारकांसाठी संजीवनी ठरते आहे.कोल्हापूर शहरापासून अगदी जवळच ज्योतिबाच्या पायथ्याशी असलेल्या छोट्या गावातील असणारे गुरव कुटुंब गेले अनेक वर्षांपासून विविध आजारांवरती ज्योतिबाच्या आणि पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या वनऔषधींच्या माध्यमातून बनवल्या जाणाऱ्या आयुर्वेदिक औषधींच्या साह्याने मधुमेह (शुगर), रक्तदाब (बीपी), लठ्ठपणा, आम्लपित्त, मुतखडा, अपचनासह डोळ्यांच्या आजार-विकारासंबधीत आयुर्वेदिक औषधी देत असून त्याचा अनेक तरुण व वयोवृद्ध रुग्णांना चांगला फायदा झाल्याची चर्चा कानावर होती.



परंतु त्यांच्या गुणकारक औषधांची ख्याती आता थेट मराठवाड्यापर्यंत पोहचली असून बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथे संजय गुरव हे अलीकडच्या तीन-चार महिन्यांपासून सातत्याने दर बुधवारी सार्वजनिक बांधकाम कार्यालय (बी अँड सी) अंबाजोगाई येथे एका शेटर (शेड) मध्ये वरील विविध आजार असणाऱ्या रुग्णांना आपल्या आयुर्वेद औषधाने उपचार करत असून त्यांची डोळ्यासबंधीतील औषधी तथा ड्रॉप तर चांगलाच प्रभावी ठरत असून अनेकांची दृष्टी सुधारली असून काही रुग्णांना तर मोतीबिंदू-काचबिंदू सह डोळ्यांच्या इतर समस्यांमध्येही मोठा फायदा होत असल्याची चर्चा स्वतः रुग्णांकडूनच ऐकावयास मिळत असल्याने इतर आजारांपेक्षा गुरव यांची डोळ्यांच्या औषधीची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात लाभकारक ठरत असल्याची माहिती खुद्द ही औषधी टाकून घेत असलेल्या रुग्णांनीच दिली आहे. यामुळे आमच्या प्रतिनिधीनी थेट रुग्णांनाशीच संपर्क करत चर्चा केली असता प्रत्येक रुग्ण हा सकारात्मकच अनुभव सांगत असल्याने तूर्तास तरी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई व धारूर तालुक्यातील रुग्णांना गुरव यांच्या औषधीचा मोठा फरक पडत असून अनेक जणांनी चक्क आमचे ऑपरेशन ठळले असल्याची प्रतिक्रिया दिल्याने आमच्या प्रतिनिधींनी

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# एकात्मिक चाप

गेल्या तीन दशकांत देशातील शिक्षण क्षेत्राचे रूपांतर औद्योगिक क्षेत्रात झाले. या उद्योगातील आर्थिक उलाढालीचे आकडे फुगत आहेत. या शिक्षण उद्योगातील एक प्रमुख घटक म्हणजे कोचिंग क्लास. प्रवेश परीक्षांपासून स्पर्धा परीक्षांपर्यंत सर्व पातळ्यांवर कोचिंग क्लासशिवाय मोठे यश मिळविता येत नसल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले गेले आहे.

शाळा आणि महाविद्यालयांना समांतर अशी यंत्रणा उभी करीत मोठे झालेल्या कोचिंग क्लासना आणि 'इंटिग्रेटेड क्लास' या गोंडस नावाने प्रचलित झालेल्या एकात्मिक वर्गांना चाप लावण्याची केंद्र सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे. क्लासचे नियंत्रण आणि नियमन यांसाठी केंद्रीय उच्च शिक्षण सचिव विनीत जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समिती उपाययोजना सुचविणार आहे. मात्र, कोचिंग क्लासना चाप लावण्याची भूमिका घेण्याची किंवा उपाययोजना आखण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. गेल्याच वर्षी केंद्र सरकारने कोचिंग क्लाससाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती.

सोळा वर्षांखालील मुलांना कोचिंग क्लासमध्ये प्रवेश न देण्याची अटही सरकारने घातली होती. प्रत्यक्षात त्यातील कशाचीही अंमलबजावणी झाली नाही. त्याच्याही आधी राज्य सरकारने खासगी क्लासवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो अपयशी ठरला. त्यामुळे आता केंद्राने नियमनासाठी पुन्हा पाऊल उचलले आहे. या निमित्ताने कोचिंग क्लास आणि 'इंटिग्रेटेड क्लास' यांची चर्चा ऐरणीवर आली हेही नसे थोडके. देशातील कोट्यवधी मुलांशी संबंधित असलेल्या कोचिंग क्लासकडे खरे तर गांभीर्याने पाहायला हवे. एके काळी कोचिंग क्लास लावणे कमीपणाचे मानले जायचे; अभ्यासात गती नसलेल्यांसाठी शिकवणीचे वर्ग असल्याचेही मानले जायचे. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, कोचिंग क्लास अपरिहार्य असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले आहे. तसे होण्यात शिक्षण खात्यापासून क्लास चालविणाऱ्यांपर्यंतचे 'अर्थ'पूर्ण संबंध असले, तरी या क्षेत्रातील गैरप्रकार आणि अपप्रवृत्ती दूर करण्यासाठी खूप आधीपासून प्रयत्न व्हायला हवे होते. उशिरा का होईना आता प्रयत्न होतो आहे, हे चांगलेच; परंतु त्याचे यशापयश अंमलबजाणीवर अवलंबून असेल.

गेल्या तीन दशकांत देशातील शिक्षण क्षेत्राचे रूपांतर औद्योगिक क्षेत्रात झाले. या उद्योगातील आर्थिक उलाढालीचे आकडे फुगत आहेत. या शिक्षण उद्योगातील एक प्रमुख घटक म्हणजे कोचिंग क्लास. प्रवेश परीक्षांपासून स्पर्धा परीक्षांपर्यंत सर्व पातळ्यांवर कोचिंग क्लासशिवाय मोठे यश मिळविता येत नसल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले गेले आहे. त्यातूनच या क्लासचे जाळे देशभर विणले गेले. सध्या त्यातील उलाढाल सुमारे साठ हजार कोटी रुपयांची असल्याचे मानले जाते. पुढील पाच वर्षांत ही उलाढाल दीड लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल, असा अंदाज एका अहवालात वर्तविण्यात आला आहे.

# शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची निवासी क्रीडा प्रबोधिनी शाळेला भेट

प्रतिनिधी @ बदनापुर



महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री माननीय श्री दादाजी भुसे साहेब यांनी जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनी येथे भेट दिली आणि क्रीडा प्रबोधिनीचे आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती घेतली. क्रीडा प्रबोधिनी येथील मुलांनी आतापर्यंत मिळवलेल्या सर्व चषक यांची माननीय मंत्री महोदयांनी पाहणी केली त्याचबरोबर क्रीडा प्रबोधिनी येथील विद्यार्थ्यांसोबत तसेच पालकांसोबत हितगुज केली.

त्याचबरोबर राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना त्यांनी बक्षीस दिली. क्रीडा प्रबोधिनी ची आजपर्यंतची वाटचाल कशी झाली व त्याच्यासाठी निधी कुठून जमा केला हे सर्व माहिती घेतली व त्यांना जेव्हा सांगण्यात आली की ही प्रबोधिनी जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी जिल्हा परिषदेच्या मुलांसाठी चालवलेली एक आगळीवेगळी क्रीडा प्रबोधिनी आहे हे ऐकल्यानंतर त्यांना खूप आनंद झाला. आणि इथून पुढे क्रीडा प्रबोधिनी क्रीडा प्रबोधिनीची वाटचाल निर्विवादपणे चालण्यासाठी माननीय मंत्री महोदयांना निधीची मागणी करण्यात आली आणि वेगळे लेखा शीर्षक तयार करून निधी देण्याचे मंत्री महोदयांनी कबूल केले. याप्रसंगी जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्णात पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीशजी मिनियार, शिक्षण उपसंचालक मुकुंद साहेब, सहाय्यक संचालक सतीश सातव साहेब, शिक्षणाधिकारी माध्यमिक बाळू खरात, शिक्षणाधिकारी प्राथमिक सानप मॅडम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, पंडित दादा भुतेकर, शैलेश घुमारे, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्ह,श्रीमती विनय वडजे, सुभाष भालेराव, शिक्षक संघटनेचे

श्री अरुण जाधव श्री रवींद्र काकडे श्री प्रभाकर शिंदे श्री सुनील मावकर श्री प्रमोद खरात प्रशाला चे मुख्याध्यापक श्री प्रकाश कुंडलकर व क्रीडाप्रबोधिनीचा संपूर्ण स्टॉप कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# राणी कोरडे हिने डी फार्मसी मध्ये प्रथम क्रमांक



प्रतिनिधी @ बदनापुर

बदनापूर तालुक्यातील रावसाहेब पाटील दानवे फार्मसी कॉलेज या कॉलेजमध्ये डी फार्मसी फर्स्ट इयर मध्ये ८४ टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला याबद्दल डिजिटल मीडिया संघटना पत्रकार जिल्हाध्यक्ष किशोर पाटील शिरसाट नारायण ब्राह्मणे संजय भुसाळ आदिल खान बाबासाहेब सोरमारे योगेश सोरमारे शुभम होरशीळ गजानन जोशी कल्याण सोरमारे सुरेश सोरमारे सतीश सोरमारे अक्षय देवकर यांनी राणी कोरडे हिचे प्रथम क्रमांक घेतल्यामुळे अभिनंदन केले

# गोदापात्रातून ३०० ब्रास वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक २६ जणांवर गुन्हे

प्रतिनिधी @ शहागड

अंबड तालुक्यातील शहागड येथील गोदावरी नदीपात्रातून तब्बल १० लाख रुपये किमतीची ३०० ब्रास वाळू अवैधरीत्या उपसा करून वाहतूक केल्याप्रकरणी २६ वाळूमाफियांविरुद्ध गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणात तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशानुसार महसूल विभागाचे मंडलाधिकारी नारायण बामणावत यांनी शुक्रवारी रात्री उशिरा कारवाई केली. शहागड गावातील जुना पूल, महादेव मंदिराजवळ, पाणीपुरवठा समर्थ कारखान्या च्या विहिरीजवळ नदीपात्राची पाहणी केली असता, तेथे तीन ठिकाणी वाळूचे अवैध उत्खनन करून वाहतूक केल्याचे आढळून आले.महसूल प्रशासनाने याप्रकरणी संबंधित वाळूचा पंचनामा करून पुढील कारवाई सुरू केली आहे.

मंडळ अधिकारी नारायण बामणावत यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलिस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणी शाहरुख शहा, संदीप धात्रे, जुनेद तांबोळी, योगेश परदेशी, इरफान तांबोळी, अमर बागवान, इद्रीस शहा, दत्तात्रेय ढगे, नितीन परदेशी, अयाज बागवान, चंद्रकांत लव्हाळे, सचिन परदेशी, मुक्तार शहा, नवीद तांबोळी, गणेश कुकरे, समिदीन शेख, अजय निकाळजे, भैय्या येटाळे, गणेश उमरे, संजय लक्ष्मण रौटेवाड, लखन परदेशी, प्रदीप धोत्रे, अजय परदेशी, बाबासाहेब येटाळे, संजय उंबरे, अविनाश हारेर (रा. सर्व. शहागड, ता. अंबड) यांच्याविरुद्ध गोदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन त्यांची चौकशी पोलिसांनी सुरु केली आहे.

# शेतकऱ्यांच्या पीक कर्जासाठी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली बँकेची कान उघडणी

प्रतिनिधी @ बीड



सध्या सुरु असलेल्या खरीप हंगामात शेतकऱ्यांस आर्थिक अडचण निर्माण होत आहे. एक रुपयात पीक विमा ही योजना शासनाने गुंडाळली. तर नवीन पीक विम्या साठी शेतकऱ्यांना बँकानी प्रचंड नियम व अटी लादल्या आहेत. बँके कडुन शेतकऱ्यांचे सिबिल तपासले जात आहे. या विरोधात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे व विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे यांच्या शेतकरी हिताच्या संकल्पने नुसार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भारतीय स्टेट बँकेच्या मुख्य शाखेत जाऊन अधिकाऱ्यांची शाळा घेऊन कानउघडणी केली.

शिवसेना प्रदोत सुनिलजी प्रभू, प्रवक्त्या सुषमाताई अंधारे व संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव यांच्या आदेशानुसार आज शिवसैनीकांनी आपला मोर्चा बँके कडे वळवला. पीक कर्जासाठी आलेले अर्ज किती? मंजूर अर्ज किती? नामंजूर अर्ज किती? प्रलंबित अर्ज किती व प्रलंबाचे कारण काय? पीक कर्जाचे उद्धीष्ट किती? शेतकऱ्यांना सिबिल चे कारण सांगून किती शेतकऱ्यांचा अर्ज नामंजूर केला ? या सह असंख्य प्रश्न उपस्थित करून शिवसैनिकांनी बँक अधिकाऱ्यांची शाळा घेतली.यावेळी महिला जिल्हा संघटक मीरा ताई नवले, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवाले, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,कामगार सेना रवी वाघमारे,नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे,सतीशसिंह परदेशी, गणेश लोणकर, मच्छिंद्र काळे, सतीश मस्के, नंदकुमार घोगरे,शेख मुजमिल,रमेश नवले,विशाल तांबे व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

**मा. पी. व्ही. चव्हाण २२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, केज यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २५३ / २०२५**
खदिरमियाँ विरूध्द निरंक
नि. ११सी.

अर्जदार
१. खदिरमियाँ इब्राहीम खुरेशी वय - ६९ वर्षे, धंदा -पेन्शनर, रा. मदिना मस्जिद जवळ केज, ता. केज. जि. बीड
२. मकसुद खदिरमियाँ खुरेशी वय - ३८ वर्षे, धंदा व्यापार, रा. बाबासाहेब आंबेडकर चौक, मंगळवार पेठ, कोज, ता. केज, जि. बीड.
३. रिजवाना मुजाहिद खुरेशी उर्फ रिजवाना खरिदमियाँ खुरेशी वय - ३५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. रोजा मोहल्ला केज, ता. केज. जि. बीड.

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रूकसाना उर्फ रूकसानाबी खदिरमियाँ खुरेशी रा. केज ता. केज जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी रूकसाना उर्फ रूकसानाबी खदिरमियाँ खुरेशी यांचा मृत्यु दि. २८. १०.२०२० रा. कोतन ता. पाटोदा जि. बीड येथे मृत्यु झाला असुन अर्जदार क्र.१ हा मयत रूकसाना खदिरमियाँ खुरेशी यांचे पती असुन अर्जदार नं. २ मुलगा व अर्जदार नं ३ ही विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क. १ ते ३ यांच्या शिवाय मयतास इतर कोणीही अन्य जवळचे कायदेशीर वारस नाहीत.

मयत रूकसाना उर्फ रूकसानाबी खदिरमियाँ खुरेशी यांचे निधन झाले आहे. मयताचे पश्चात शासकीय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रूकसाना उर्फ रूकसानाबी खदिरमियाँ खुरेशी यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८ जून २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख. दि. २८/०७/२०२५ आहे.

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**
**२ रे सह.दि.न्या.क.स्तर, केज**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहा.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, केज**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान/श्रीमती हनुमंत नाथा जंगले रा. वढीकाळ्या ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म/मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | कपिल हनुमंत जंगले | मुलगा | ०२/१२/२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१६/६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे..

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथे जागतिक योग दिनानमित्त योग स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ अंबड



जागतिक योग दिनानमित्त योग शिक्षक गजानन पांडुरंग पुरी, यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथे शाळेचे मुख्याध्यापक महावीर शेलार, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक नरेंद्र रत्नपारखे, प्रदीप जाधव, चक्रपाणी मुळे, भीमराव ढाकणे, सारिखा इंगळे, अश्विनी चौधरी, शितल वानखेडे आदींच्या मार्गदर्शनाखाली व अंबड पोलिस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल रामेश्वर मूळक, सामाजिक कार्यकर्त्या, ज्येष्ठ विधीज्ञ ड.आशाताई गाढेकर, सरपंच दत्ता जाधव, राजमुद्रा अभ्यासिकाचे संचालक गणेश मुळे, मा.सरपंच शामसुंदर मुळे, बाळराजे जाधव, प्रा.गणेश श्रीमंतराव मुळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कारभारी मस्के, उपाध्यक्ष दिगंबर जाधव, भगवान खंडागळे, ऋषी इंगळे, हनुमान मुळे, गणेश मुळे, सुखदेव खंडागळे, कृष्णा मिसाळ, अंगणवाडी सेविका इंदुमती गुढेकर, आशाताई मीना साबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सूर्य नमस्कार स्पर्धेचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्तेओमकार प्रतिमेस पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.सूर्यनमस्कार स्पर्धेत प्रथम दिव्या किरण साबळे, द्वितीय वैष्णवी दत्ता मुळे, तृतीय यश नंदू मस्के, चतुर्थ श्रद्धा खंडागळे, आनंद साबळे, आरती मुळे, शिवराज इंगळे, आदी स्पर्धेतील विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षी देऊन गौरविण्यात आले असून सूक्ष सूक्ष्म हालचाली, सूर्यनमस्कार, त्याचे बारा प्रकार मंत्रोच्चारात, ताडासन, वृक्षासन आदी आसने व अनुलोम-विलोम दीर्घ श्वसन, आधी प्राणायाम घेण्यात येऊन त्याची व्याख्या, निषेध,कृती, लाभ,दक्षता, घ्यावयाची काळजी, जागतिक योग दिनाचे महत्त्व, इतिहास, योग साधनेचे महत्त्व, २१ जून या दिवसाचे महत्त्व, योग म्हणजे काय, स्पर्धा परीक्षेचे महत्व आदिविषयी सविस्तर माहिती ड. आशाताई गाढेकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल, रामेश्वर मुळक, मुख्याध्यापक महावीर शेलार, उपक्रमशील शिक्षक नरेंद्र रत्नपारखे, योगशिक्षक गजानन पांडुरंग पुरी, प्रदीप जाधव, आदींनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले असून होतकरू गरीब कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी ड. आशाताई गाढेकर यांनी घेतली असून त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## पान १ वरून...

**शेतकऱ्यांना पीक कर्ज ...**

अधिकाऱ्यांना काळे फासु असा इशारा दिला. या आंदोलनाला जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, युवा सेना तालुका अधिकारी बारीकराव येवले, उप तालुकाप्रमुख अशोक सगळे, उप तालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सचिव नंदकुमार येवले, युवानेते मुकेश घुमरे, भरत खरात, विशाल पटेकर, महेश लांडगे, ज्ञानेश्वर सिंघन , राजेंद्र भोसले, सखाराम बेंगडे, कृष्णा तांदळे, रामा कदम, बाबु कुंटे, चंदू बजगुडे, किशोर गायके, समाधान वरेकर, बबलू तिपाले, बबनराव काकडे, प्रविण पवार यांच्यासह शेतकरी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**माथाडी कायद्याचे ....**

बदनाम करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आणून, जे माथाडी कामगार गुंडगिरी व खंडणी खोरीत अडकलेले असतील त्यांना जरुर जेलबंद करावे असेही बाबांनी यावेळी निक्षून सांगितले.मात्र बडी मंडळी, कारखानदार माथाडी कायद्याला जुमानत नसल्याचे ही पवारांचे निदर्शनास आणून दिले. ५% कारखानदार ही राज्यात माथाडी मंडळात नोंदीत नसल्याचे यावेळी सांगण्यात आले. एव्हढेच नाही तर गेले ५४ वर्षात ( कायदा १९६९ साली झाला..) एकाही साखर कारखान्यात हा कायदा पोहोचू शकलेला नाही हे जळजळीत वास्तव पवारांचे निदर्शनास आणून दिले.माथाडी कायद्याचे अंमलबजावणी साठी सरकार स्वतः चे तिजोरीतून एक पैसाही खर्च करीत नाही.लागणारा संपूर्ण खर्च, माथाडी कामगारांचे लेव्ही मधून केला जातो. म्हणूनच या कायद्याकडे जगातील अनेक देशाचे लक्ष लागले असून, नुकतेच स्विझरलँड येथील जिनिव्हा मधील आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या संमेलनात या कायद्याची प्रशंसा केली गेल्याचे ही यावेळी सांगण्यात आले.मा. शरद पवारांना दिलेल्या निवेदनात म्हणूनच शेवटी अशी विनंती करण्यात आली की, मालक संघटना बरोबर च सरकार बरोबर ही चर्चा घडवून आणावी.आमचा लोकशाही मूल्यावर, संवाद व विचार विनिमयावर विश्वास असल्याने, चर्चे द्वारे मार्ग निघू शकतो यावर विश्वास आहे. मात्र आम्हाला अंधारात ठेवून सरकार जर परस्पर कायदा बदलायला निघणार असेल तर, आम्हाला रस्त्यावर उतरून संघर्ष करावा लागेल असेही सांगितले.या वर शरद पवार म्हणाले की,बाबा हे सांगण्यासाठी तुम्ही कशाला आलात, मला कळविले असते तर मीच तुमच्या कडे आलो असतो. तसेच त्यांनी या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांना लगेच पत्र पाठविण्याची सूचना आपल्या स्वीयसहाय्यकास दिल्या.मा. शरद पवारांना आज भेटलेल्या शिष्टमंडळात बाबा बरोबर, महामंडळाचे उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, सरचिटणीस साथी सुभाष लोमटे, साथी विकास मगदूम, चिटणीस हनुमंत बहिरट, संघटक गोरख मेंगडे व साथी प्रदीप इ. चा समावेश होता.

**कोल्हापूरच्या संजय...**

थेट संजय गुरव यांच्याशीही वार्तालाप केला असता मी डॉक्टर नाही परंतु माझ्या कुटुंबाची या औषधाची अनेक वर्षांपासूनची परंपरा असून कोल्हापूर आणि कोल्हापूर परिसरात अनेक दृष्टीदोष असणाऱ्या रुग्णांना आमच्या औषधीचा खूप चांगला फायदा झाल्यानेच आम्ही कोल्हापूरच्या बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि आता महाराष्ट्रभरात अनेक ठिकाणी आमच्या औषधींचा चांगलाच प्रभाव दिसून येत असल्याने रुग्णांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद वाढला असून ज्योतिबाच्या कृपेने आणि आमच्या हातगुणाने रुग्णांना मोठा फायदा होत असल्याने त्या आनंदाचे शब्दात मोजमाप न करता येणारे असल्याचे समाधान

## पान १ वरून...

आम्हा कुटुंबियांना लाभत असून ज्योतिबाच्या आणि पन्हाळगडाच्या डोंगरपट्ट्यात या अत्यंत प्रभावी व गुणकारी औषधी उपलब्ध असून आम्ही कुटुंबीय ती गोळा करूनच त्यापासून अतिशय दर्जेदार औषधांची निर्मिती करून अगदी परवडणाऱ्या माफक दरात रुग्णांना ती उपलब्ध करून देत असल्याने आता दिवसेंदिवस मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली असून ती पुरवणेही आम्हाला कठीण जात आहे.

परंतु आम्ही कुटुंबीय मागे न हटता नित्यनेमाने ती जमा करून त्या माध्यमातून पुण्यकारक सेवा करत असून दख्खनचा राजा आमचे दैवत ज्योतिबाच्या कृपेने आमच्या प्रयत्नांना चांगले यश लाभत असून विशेष करून आमची डोळ्यांची औषधी तथा ड्रॉप तर रुग्णांना खूपच लाभधारक ठरत असून रुग्णांचे समाधानच आम्हाला खूप काही सांगून जात असल्याने आम्ही हे आमचे सामाजिक दायित्व समजून आमचा कौटुंबिक वारसा पुढे चालवत असल्याची प्रतिक्रिया खुद्द संजय गुरव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आणि यासाठी इतक्या दूरून येऊनही मी केवळ शंभर (१००) रुपये घेत असून याचा जास्तीत जास्त रुग्णांनी फायदा घेऊन दृष्टीसंबंधीचे व इतरही आजारांचे दोष विकार बरे करण्यासाठी आमच्या औषधींचा फायदा घ्यावा असे आवाहनही संजय गुरव यांनी आमच्या माध्यमातून केले आहे.



बीड - तालुक्यातील रामगडावरून पंढरपूर कडे आज पालखी मार्गस्थ झाली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी महंत योगीराज महाराजांचा सत्कार करून आशीर्वाद घेतले, यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशीं सह आदी.


# महिला सरपंचांवर सापळा? पालीत विरोधकांचा खेळखंडोबा; मंजुषा नवले यांचा संतप्त सवाल

## मी फक्त महिला आहे म्हणून..गावाचा विकास थांबवायचा ?सरपंच मंजुषा नवले

आयेशा शेख @ पाली

महिला सबलीकरणाची फक्त गाजावाजा, प्रत्यक्षात सत्तेचा वापर करण्यास विरोध अशा संतप्त शब्दांत पाली (कपिलधारवाडी) ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच सौ. मंजुषा शैलेंद्र नवले यांनी पालकमंत्री मा. अजित पवार यांच्याकडे आपली व्यथा मांडली आहे. फक्त मी महिला असून जनतेतून निवडून आले या कारणाने विरोधी गटातील सदस्यांकडून सातत्याने अडथळे आणले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.सरपंच नवले यांनी एका थेट आणि तीव्र शब्दांत निवेदन देत सांगितले की, पाली गावाला लागून असलेल्या बिंदुसरा धरणातून बीडसह १८ गावांना नियमित पाणीपुरवठा होत असताना, पाली गावाला मात्र आठ दिवसातून एकदाच पाणी दिले जाते, ही अन्यायाची परिसीमा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ग्रामपंचायतीत विरोधी गटाचे दहा सदस्य कोणत्याही विकास कामाला मंजुरी देत नाहीत, कोणत्याही ठरावावर स्वाक्षऱ्या न करता कामकाज ठप्प केल्याचे दुःख त्यांनी व्यक्त केले. यामुळे गावातील मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.सरपंच सौ. नवले यांनी आपल्या निवेदनात असेही नमूद केले आहे की,जर



मला काम करण्याची संधी दिली जाणार नसेल, तर मी सरपंच पदाचा राजीनामा द्यायलाही तयार आहे. पण गावाचा विकास थांबवणाऱ्या वृत्तीचा तीव्र निषेध आहे.तसेच त्यांनी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे आवाहन केले की,आपण राज्यात विकासाचे अध्वर्यू म्हणून ओळखले जाता, बीडचे पालकमंत्री म्हणून आपण हस्तक्षेप करून प्रशासनाला निर्देश द्यावेत, जेणेकरून गावातील विकास कामांना गती मिळेल.या निवेदनाने जिल्हा प्रशासनासह राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, महिला सशक्तीकरण फक्त बोलण्यापुरतेच आहे का? असा प्रश्न आता सामान्य नागरिकांमध्येही विचारला जात आहे.



प्रतिनिधी @ अंबाजोगाई

कै. दे.बा.ग.यो.नू.विद्यालय मेडिकल कॉलेज परिसर येथे दि. २१-०६-२०२५ शनिवार रोजी शाळेत जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग शिक्षक मा.श्री. मोरगावकर हे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शाळेच्या वतीने विभाग प्रमुख श्री. श्रीनिवास वैद्य सर यांनी श्री. मोरगावकर सर यांचे यथोचित स्वागत केले. शाळेच्या मैदानावर सर्व विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. यावेळी शाळेचे विभाग प्रमुख मा.श्रीनिवास वैद्य सर, सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरातील समस्यांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक




## भुयारी गटार, नगर रोडचे डिव्हायडर, नळ कनेक्शन बाबत झाली चर्चा

प्रतिनिधी @ बीड

बीड शहरातील अनेक महत्त्वाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सोमवारी (दि.२३) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार यांच्या दालनात बैठक घेतली. या बैठकीत बीड शहरातील भुयारी गटार योजना, नगर रोडवर जिल्हा न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्यासाठी दुभाजक खुला करणे, नवीन अटल अमृत योजनेचे नळ कनेक्शन तसेच शहरात सुरू असलेली स्वच्छता मोहीम या महत्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीड शहरात भुयारी गटार योजना अर्धवट अवस्थेत बंद पडली आहे. ही बंद पडलेली कामे तातडीने पुनरुज्जिवीत करण्याची मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली. तसेच नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि न्यायालयात जाण्यासाठी नागरिकांना रस्ता दुभाजक खुला करण्याची गरज व्यक्त केली. यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी होईल, असे मत आ. क्षीरसागर यांनी मांडले.याशिवाय, अमृत अटल जल योजनेंतर्गत नव्याने सुरू करण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे अनेक नागरिकांना अद्याप कनेक्शन मिळालेले नाहीत. ही कनेक्शन तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी सूचना बैठकीत करण्यात आली. यासोबतच, बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेला प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त करत, यंत्रणांनी अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन आ. क्षीरसागर यांनी केले. दरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह बीड नगरपरिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि इतर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# अजिंक्यदादा डोईफोडे यांचेकडून शाळेत मोफत नोटबुक वाटप

प्रतिनिधी @ जामखेड

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जामखेड (प) येथे जामखेड गावचे भूमिपुत्र तसेच हल्ली पाचोड येथे स्थायिक झालेल्या आणि अजिंक्य हार्डवेअर या प्रतिष्ठान चे सर्वेसर्वा असलेल्या श्री. अजिंक्य दादा डोईफोडे यांच्या कडून मोफत नोटबुक वाटप करण्यात आले . यावेळी त्यांच्या सत्काराचा छोटेखानी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास अजिंक्य दादा मित्रमंडळाचे सदस्य , शालेय व्यवस्थापन समिती चे सदस्य , गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि शाळेचा सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होता यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक डॉ. विजय पंजरकर सर यांनी केले तर , तर गावातील शिक्षण प्रेमी नागरिक भगवान आबा भोजने



यांनी त्यांचे वीचार प्रगट केले.शाळेच्या वतीने प्रास्तविक श्री. दीपक चतुरकार सर यांनी केले तर आभरप्रदर्शन श्री. संतोष काकडे सर यांनी केले यावेळी शाळेचा शिक्षकवर्ग सातपुते मॅडम, काळे मॅडम, पाटील मॅडम , सतिश चाहुर सर इत्यादी ची उपस्थिती होती . योग दिवस साजरा करण्यात आला.जामखेड (प्रतिनिधी )दिनांक २१जून २०२५ ला जागतिक योग दिनाचे औचित्य साधून येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जामखेड (प) येथे शनिवारी सकाळी योग दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी शाळेचे सहशिक्षक श्री. संतोष काकडे आणि श्री. सतिश चाहुर सर यांनी इयत्ता १ते ४च्या विद्यार्थ्यांकडून सोप्या यौगिक क्रिया करून घेतल्या यामध्ये ताडासन , वृक्षसन इत्यादी चा समावेश होता. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डॉ.पंजरकर सर आणि इतर शिक्षक सातपुते मॅडम, काळे मॅडम, चतुरकार सर , पाटील मॅडम , शाळेचे इतर कर्मचारी फैसल भाई इत्यादी

# नीट परीक्षेत विजय सोनवणे चे यश नगरसेवक गोरख खैरे यांनी केला सत्कार

प्रतिनिधी @ बदनापुर

बदनापुर तालुक्यातील नागठाणा येथील शेतकरी कैलास राव सोनवणे यांचा मुलगा विजय सोनवणे यांने नीट परीक्षेत यश संपादन केले.वैद्यकीय महविद्यालय प्रवेशासाठी नीट परीक्षा घेतली जाते.याही वर्षी मे महिन्यात वैद्यकीय महाविद्यालय प्रवेशासाठी नीट परीक्षा घेण्यात आली होती.या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत विजय सोनवणे या विद्यार्थ्यांने घवघवीत यश मिळविले आहे.ग्रामीण भागातून नीट परीक्षेमध्ये यशस्वी होणा-या विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी आहे.मात्र नीट परीक्षेमध्ये विजय सोनवणे यांने अधिक परिश्रम



घेऊन यश संपादन केले आहे. या यशाबद्दल चेअरमन रघुनाथ अप्पा खैरे,नगरसेवक गोरख खैरे तथा सभापती, नगरसेविका सौ भाग्यश्री खैरे प्रा.संदिप खैरे, पत्रकार संजय भुजाळ,रमेश राव बनकर , योगेश खैरे,विलास सोनवणे, यांनी अभिनंदन करुन विजय सोनवणे

# सुपा एमआयडीसीत कंपनीने केला विश्वासघात! १५० युवकांना नोकरीच्या नावाखाली फसवले

प्रतिनिधी @ अहिल्यानगर

नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील सुपे चखऊ्र मधील ऋचउउ कंपनीत १५० युवकांवर गंभीर अन्याय झाला आहे. कंपनीने या युवकांना कायमस्वरूपी नोकरीचे आश्वासन देऊन तीन वर्षे कमी पगारावर ऑन रोल ट्रेनी म्हणून काम करून घेतले. या काळात वारंवार लवकरच पर्मनंट करू असे सांगितले गेले. मात्र, तीन वर्षांच्या सेवेनंतर कंपनीने या युवकांना कॉन्ट्रॅक्टवर काम करण्याचा पर्याय दिला, नाहीतर कंपनी सोडण्याचा अल्टिमेटम दिला. यामुळे युवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.या प्रकरणी भाजप तालुका युवा मोर्चा अध्यक्ष मनोज मुंगसे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या प्रकारावर मनोज मुंगसे यांनी कंपनीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी आरोप केला की, ऋचउउ कंपनीतील सर्व कॉन्ट्रॅक्ट्स (बस, लेबर, स्क्रॅप) हे जिल्ह्यातील एका मोठ्या नेत्याशी संबंधित आहे. इतकेच नव्हे, तर कंपनीचा मॅनेजर हा त्या मोठ्या नेत्याचा कार्यकर्ता असल्याचा गंभीर दावा मुंगसे यांनी केला. कंपनीने युवकांची स्वप्ने आणि विश्वासघात केला आहे. हे अन्यायकारक आहे आणि आम्ही याविरोधात आवाज उठवू,असे मुंगसे यांनी सांगितले.स्थानिक युवकांनीही कंपनीच्या या धोरणाला कडाडून विरोध दर्शवला आहे. आम्ही तीन वर्षे मेहनत केली, पण आता आम्हाला कॉन्ट्रॅक्टवर ढकलले जात आहे. ही फसवणूक आहे, असे एका कंपनीत काम करणाऱ्या युवकाने सांगितले.

या प्रकरणामुळे सुपे चखऊ्र मधील औद्योगिक वातावरण तणावपूर्ण बनले आहे. भाजप युवा मोर्चाने या प्रश्नी कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा करण्याची मागणी केली असून, आवश्यकता भासल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. कंपनीकडून याबाबत कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही. हा वाद पुढे काय वळण घेतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### बेरोजगार युवकांना कंपनी रोलवर कामाला घ्या

मनोज मुंगसे यांनी आक्रमक पवित्रा घेत सुपा एमआयडीसीतील कॉन्ट्रॅक्ट पद्धत बंद करून बेरोजगार युवकांना तसेच भूमिपुत्रांना कंपन्यांमध्ये कंपनी रोलवर काम मिळावे ही प्रामुख्याने मागणी आहे असे न झाल्यास येणाऱ्या काळात आंदोलनात्मक भूमिका घेऊ असे भाजप युवा मोर्चाचे पारनेर तालुका अध्यक्ष मनोज मुंगसे यांनी सांगितले.



प्रतिनिधी @ बीड

गुरुनानक प्राथमिक विद्यालयात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.ऐतिहासिक योग संगम कार्यक्रमांतर्गत साजरा करण्यात आलेल्या आणि धेसर ऋ जपश एरीींह जपश क्शरश्रींह(एक पृथ्वी,एक आरोग्य ,यासाठी योग) ही थीम असलेला हा उपक्रम सकाळी ६.३० ते ७.४५ दरम्यान पार पडला.विशेष म्हणजे यात शाळेचे विद्यार्थी तसेच त्यांचे पालक देखील सहभागी झाले.

# उत्कृष्ट कामगिरबद्दल परतूर पोलिसांचा गौरवछत्रपती संभाजीनगरीत

प्रतिनिधी @ परतुर

वीरेंद्रमिश्र विशेष पोलिस महानिरीक्षक, परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांचे हस्ते प्रशस्तीपत्रदेऊन गौरण्यात आले. असताना पोलिस स्टेशन परतूर येथील अधिकारी आणि अमलदार, यांनी परतूर शहरात तसेच हद्दीत घडलेले चोरी, जबरी चोरी, मोटार सायकल चोरी, जनावर चोरी, शेतकरी यांचे इलेक्ट्रिक मोटार चोरी, सोलर वायर चोरी इत्यादी चोरांची टोळी जेरबंद करून त्यांना हद्दपार केले, आणि होणाऱ्या गुन्ह्यावर प्रतिबंध केले,

तसेच १६ बदमाश गावगुंड यांना हद्दपार केले, हद्दीत उत्कृष्ट कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कामकाज केले त्यानी केलेल्या या



चांगल्या कामगिरी मुले मा. श्री. वीरेंद्र मिश्र, वि. पो. महानिरीक्षक साहेब, छ. संभाजी नगर, मा. श्री. अजय कुमार बन्सल, पोलिस अधीक्षक साहेब जालना, मा. श्री. आयूष नोपानी, अप्पर पोलिस अधीक्षक साहेब, पोलिस अधीक्षक जालना यांचे कार्यालयात आज रोजी त्यांनी केलेल्या चांगल्या कामगिरी मुले एम. टी. सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर, विठ्ठल केंद्रे, पो.उप. निरीक्षक, अमोल राऊते पो. उप. निरीक्षक, पोका/ सतीश जाधव, पोका/ नरेंद्र चव्हाण, पोका/ ज्ञानेशोर वाघ, पोका/ गजानन राठोड, पोका/ राम हाडे, पोका/ वंदन पवार, पोका/ नितीन बोंडारे यांना साहेब यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

# साई मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये योग दिवस साजरा

प्रतिनिधी @ बदनापुर

साई मॉडर्न इंग्लिश स्कूल बदनापूर येथे सर्वांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक व इतर कर्मचारी आंतरराष्ट्रीय योग दिवसाला उपस्थित होते. आज च्या या योगा सेशन साठी योगा प्रशिक्षक श्री डव्होकेट बॉबी आर.अग्रवाल आणि श्रीमती.एस. बी.सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळी ८:३० वाजता शाळेच्या प्रांगणात शाळेचे सर्व विद्यार्थी उपस्थित झाले व श्री अगरवाल व श्रीमती सोनवणे यांनी सर्वांना योगाभ्यास शिकवला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी देखील आनंदाने शिकवलेले योग पूर्ण




केले. श्री गिते सर यांनी जमलेल्या सर्वांना योगाचे महत्त्व पटवून दिले व सतत योगा करण्यास प्रोत्साहन दिले.शाळेतील शिक्षक श्री कुणाल सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अशाप्रकारे साई मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा झाला.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथे जागतिक योग दिनानमित्त योग स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ बीड

जागतिक योग दिनानमित्त योग शिक्षक गजानन पांडुरंग पुरी, यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथे शाळेचे मुख्याध्यापक महावीर शेलार, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक नरेंद्र रत्नपारखे, प्रदीप जाधव, चक्रपाणी मुळे, भीमराव ढाकणे, सारिखा इंगळे, अश्विनी चौधरी, शितल वानखेडे आदींच्या मार्गदर्शनाखाली व अंबड पोलिस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल रामेश्वर मूळक, सामाजिक कार्यकर्त्या, ज्येष्ठ विधीज्ञ ड.आशाताई गाढेकर, सरपंच दत्ता जाधव, राजमुद्रा अभ्यासिकाचे संचालक गणेश मुळे, मा.सरपंच शामसुंदर मुळे, बाळराजे जाधव, प्रा.गणेश श्रीमंतराव मुळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कारभारी मस्के, उपाध्यक्ष दिगंबर जाधव, भगवान खंडागळे, ऋषी इंगळे, हनुमान मुळे, गणेश



मुळे, सुखदेव खंडागळे, कृष्णा मिसाळ, अंगणवाडी सेविका इंदुमती गुढेकर, आशाताई मीना साबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सूर्य नमस्कार स्पर्धेचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले असून सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्तेओमकार प्रतिमेस पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.सूर्यनमस्कार स्पर्धेत प्रथम दिव्या किरण साबळे, द्वितीय वैष्णवी दत्ता मुळे, तृतीय यश नंदू मस्के, चतुर्थ श्रद्धा खंडागळे, आनंद साबळे, आरती मुळे, शिवराज इंगळे, आदी स्पर्धेतील विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षी देऊन गौरविण्यात आले असून सूक्ष सूक्ष्म हालचाली, सूर्यनमस्कार, त्याचे बारा प्रकार मंत्रोच्चारात, ताडासन, वृक्षासन आदी आसने व अनुलोम-विलोम दीर्घ श्वसन, आधी प्राणायाम घेण्यात येऊन त्याची व्याख्या, निषेध,कृती, लाभ,दक्षता, घ्यावयाची काळजी, जागतिक योग दिनाचे महत्त्व, इतिहास, योग साधनेचे महत्त्व, २१ जून या दिवसाचे महत्त्व, योग म्हणजे काय, स्पर्धा परीक्षेचे महत्व आदिविषयी सविस्तर माहिती ड. आशाताई गाढेकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल, रामेश्वर मुळक, मुख्याध्यापक महावीर शेलार, उपक्रमशील शिक्षक नरेंद्र रत्नपारखे, योगशिक्षक गजानन पांडुरंग पुरी, प्रदीप जाधव, आदींनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले असून होतकरू गरीब कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी ड. आशाताई गाढेकर यांनी घेतली असून त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# ‘स्मार्ट’ शिक्षणातून घडतील गुणवंत विद्यार्थी - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

## अंबाजोगाईत नेटीझन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूलचे उद्घाटन

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



महात्मा फुले स्मारक समिती, माळी नगर अंबाजोगाई येथे नुकतेच नेटीझंस प्री.प्रायमरी स्कूलचे उद्घाटन अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विचारमंचावर डायटचे प्राचार्य योगेश सुरवसे, खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.विभीषण फड, माजी मुख्याध्यापक लंकेश वैद्य, पांडुरंग ढगे, इंगळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात डॉ.राजेश इंगोले व इतर मान्यवरांच्या हस्ते उदघाटन फित कापून आणि महापुरूषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी शिक्षण हे केवळ पुस्तकातून वाक्य बोलून शिकविल्याने आत्मसात होत नाही तर त्याला अनुभव समृद्धीची जोड दिल्यास शिक्षण हे खऱ्या अर्थाने आपल्या जीवनामध्ये वापरता येऊ शकते. आणि असे शिक्षण घेतलेली पिढी खऱ्या अर्थाने संशोधक किंवा नवनिर्माते होऊ शकतात. नेटीझन्स प्री-प्रायमरी स्कूल मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून लहान मुलांच्या बुद्धिमत्तेला विकसित करण्यासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्या ज्ञानाला आवश्यक असे अनुभव समृद्ध शिक्षण देण्याचा अभिनव प्रयत्न प्राचार्य.डॉ मिलिंद ढगे प्रथमच अंबानगरीमध्ये करीत आहेत. हा वेगळा मार्ग चोखाळलेले ढगे हे निश्चितच शिक्षण क्षेत्रात या आपल्या आगळ्यावेगळ्या मार्गाने एक नवीन संशोधक पिढी घडवतील असा विश्वास आहे.या शाळेमधील शिक्षण घेतलेले विद्यार्थी निश्चितपणे आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग समाज हितासाठी नवीन संशोधन, नवीन संकल्पना निर्मिती करून करतील यात शंका नाही. बाल वय हे आजूबाजूचे निरीक्षण करून ज्ञान आत्मसात करत असते. या वयात जर विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या मनोरंजनात्मक प्रयोगांमधून ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. तर त्यांची बुद्धिमत्ता विविध अंगांनी वाढण्याचा संभव वाढतो. त्यांची निरीक्षण क्षमता, निर्णय क्षमता आपोआप वाढते. मेंदूला प्रयोगांती मिळालेले निष्कर्ष मुलांच्या मेंदूत दीर्घकाळ लक्षात राहतो. यातून विद्यार्थ्यांच्या संशोधक बुद्धीला वाव मिळतो. एकाच गोष्टीवर विविध पद्धतीने विचार करण्याची मेंदूची क्षमता वाढते. हे अनुभव समृद्ध शिक्षण विद्यार्थ्याला अष्टपैलू बनवते त्यामुळे नेटीझन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूल निश्चितपणे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडवून आणेल यात शंका नाही असे गौरवोद्गार डॉ.राजेश इंगोले यांनी उद्घाटनपर मनोगत केले. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी शाळेमध्ये शिक्षक - विद्यार्थ्यांचे नाते घरी पालक आणि पाल्याचे नाते कसे असावे यावर प्रकाशझोत टाकत शिक्षक आणि पालकांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिली. शिक्षण घेत असताना शाळेत तसेच घरी सकारात्मक वातावरण कसे निर्माण करायचे, बालसंस्कार पालकांनी शिक्षकांनी आपल्या कृतीतून कसे द्यावे यावर मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य योगेश सुरवसे यांनी बोलताना नेटीझंस प्री-प्रायमरी स्कूलने हा अभिनव प्रयोगशील उपक्रम केला याबद्दल त्यांचे कौतुक केले. हा प्रयोग करत असताना समाजातील वंचित, गरजू घटकांना या शिक्षण प्रवाहात सामावून घेण्याचे आवाहन करीत शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना उपप्राचार्य विभीषण फड यांनी प्रा.मिलिंद ढगे हे एक अजब रसायन आहे. विविध शैक्षणिक प्रयोग करणे, सामाजिक प्रयोग करणे हा त्यांचा छंद आहे आणि त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांमध्ये त्यांना निश्चितपणे आतापर्यंत यश आलेले आहे. नेटिजन्स प्री-प्रायमरी स्कूल ही अशाच उपक्रमशील प्रयोगांची शाळा व्हावी आणि भविष्यामध्ये हा प्रयोग निश्चितपणे यशस्वी होणार आहे असे सूतोवाच केले. प्रास्ताविक करताना प्रा.मिलिंद ढगे यांनी नेटिझन्स प्री प्रायमरी नॅशनल स्कूल ही अनुभव समृद्ध शिक्षणाची प्रयोगशाळा होणार आहे. इथे शिकणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञानाच्या अनुभवासोबतच प्रयोगाचे अनुभव ही घेणार आहे. मेंदू हा वेगवेगळ्या प्रकारच्या पंचेंद्रिया द्वारे अनुभव घेत, त्या परिस्थितीची स्मृती निर्माण करून या स्मृतीचा भविष्यात आपल्या जीवनात उपयोग करत असतो.जपानमध्ये मुलांची बुद्धिमत्ता विकसित करण्यासाठी याच प्रकारच्या तत्वाचा उपयोग केला जातो. हेच हेरून या नेटिझन्स प्रीप्रायमरी नॅशनल स्कुलमध्ये स्मार्ट स्क्रीन, स्मार्ट वैज्ञानिक खेळणी, स्मार्ट खेळ आणि सोप्या भाषेत अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. त्यामुळे इथं शिकणारा प्रत्येक विद्यार्थी हा निश्चितपणे स्मार्ट विद्यार्थी बनणार आहे असे आश्वासन उपस्थित पालकांना दिले. हे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञान असणार नाही. तर त्याला विविध उपक्रम आणि प्रयोगाची जोड दिल्याने ते शिक्षण या विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये कायमस्वरूपी स्मरणात राहणार आहे

# ’पाटोदा ते मोटेगाव’ या मार्गावर शिव रस्त्याच्या सध्या सुरू असलेल्या कामाची चौकशी करा

## प्रदेश सचिव सचिन फोलाने यांचे उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



सचिन मुरलीधर फोलाने
(प्रदेश सचिव, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार)

तालुक्यातील 'पाटोदा ते मोटेगाव' या शिव रस्त्याचे सध्या सुरू असलेले काम हे निकृष्ट दर्जाचे होत आहे. असे पंचक्रोशीतील नागरिकांचे म्हणणे आहे. तरी या प्रकरणी सदरील रस्ता कामाची खातेनिहाय चौकशी करून या कामाचा जो कोणी संबंधित ठेकेदार असेल त्याच्यावर कडक कारवाई करण्यात यावी व सदर कामाचे बिल मंजूर करू नये अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना शुक्रवार, दिनांक २० जुन रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, 'पाटोदा ते मोटेगाव' या मार्गावर शिव रस्त्याचे सध्या सुरू असलेले डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे दिसून येत आहे. रस्त्याच्या गुणवत्तेबाबत स्थानिक नागरिकांत तीव्र नाराजी आहे. केवळ वरवरचे डांबर टाकून तांत्रिक निकष आणि मानकांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे स्पष्टपणे जाणवते. निकृष्ट सामग्रीचा वापर, अपुरे बेस तयार करणे आणि आवश्यक देखरेख व गुणवत्ता चाचणी न करणे, ही गंभीर त्रुटी या कामात आढळत आहेत. या सर्व प्रकारांची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, व तोपर्यंत किंवा चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर कामाचे कोणतेही बिल मंजूर अथवा वितरीत करू नये, अशी नम्र विनंती आहे. यामुळे सार्वजनिक निधीची लूट थांबवता येईल व गुणवत्तापूर्ण सार्वजनिक सुविधा नागरिकांना मिळू शकतील. अशी अपेक्षा ही सदरील निवेदनातून राष्ट्रवादी युवक काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी व्यक्त केली आहे.

# कीट्टी आडगाव चे सरपंच रुख्मांगद खेत्रे यांच्यावरील गुन्हा मागे घ्यावा – केज तालुका सरपंच परिषदेची मागणी

प्रतिनिधी @ केज



दोन दिवसापूर्वी माजलगाव तालुक्या तील कीट्टी आडगाव चे सरपंच रुख्मांगद खेत्रे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले असून सदरील रक्कम ही सरपंच यांनी सदरील रक्कम ही स्वतःसाठी घेतली नाही तर विहीर मंजुरीसाठी जे अधिकारी पैसे मागतात त्यांना देण्यासाठी घेतली होती यात त्यांचा काहीही दोष नसल्याने त्यांना यागुन्ह्यातून मुक्त करावे अशी मागणी केज तालुका सरपंच परिषदेच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत सविस्तर वृतांत असा की,दोन दिवसापूर्वी माजलगाव तालुक्यातील कीट्टी आडगाव चे सरपंच रुख्मांगद खेत्रे यांनी विहीर मंजुरीसाठी लाभार्थी यांचेकडून पैसे घेतल्याचे प्रकरण घडले परंतु हे पैसे सरपंच यांनी स्वतःसाठी घेतले नाहीत तर वरिष्ठ अधिकारी विहीर मंजूर करण्यासाठी २५ ते ३० हजार रुपये मागतात मग ही रक्कम सरपंच कोठून देणार सदर लाभार्थी यासाठी ही रक्कम देतात परंतु ही रक्कम सबंधित अधिकारी सरपंच किंवा उपसरपंच किंवा रोजगार सेवक यांच्या माध्यमातून स्वीकारतात आणि त्यासाठीच त्यांनी ही रक्कम स्वीकारली यामध्ये वैयक्तिक त्यांची काहीही चूक नसून त्यांना या गुन्ह्यातून मुक्त करण्याची मागणी केज तालुका सरपंच परिषदेच्या वतीने केज तहसीलदार यांना करण्यात आली आहे. यावेळी तालुक्यातील सर्व सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योग हा सुखी व समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग आहे- डॉ ज्ञानोबा दराडे

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



देशभरात मागच्या सन २०१४ पासून २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. या योगदिनानिमित्त अंबाजोगाई येथेही विविध ठिकाणी हा योगदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. शहराच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देखील तीन दिवशीय योग शिबिराचे आयोजन केले होते.या तीन दिवसीय

योग शिबिरात योग प्रशिक्षक म्हणून नेत्र विभाग प्रमुख डॉ ज्ञानोबा दराडे यांनी अतिशय उत्तम अशी कामगिरी बजावली . यावेळी त्यांनी योग साधनेबाबत मार्गदर्शन करतांना स्पस्ट केले की योग हा सुखी समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग आहे, त्यामुळे नियमितपणे सर्वांनी किमान ४५मिनिट योगसाधना करण्याचे आवाहन डॉ दराडे यांनी केले. या शिबिरात स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांच्यासह अनेक डॉक्टर उपस्थित होते.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने मागील ११ वर्षापासून योगदिन साजरा करण्यात येत आहे.स्वा रा तिच्या योगशिबिरात अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी देखील उपस्थित सर्वाना प्राणायाम व योगसाधनेचे महत्त्व विषद केले. त्याबरोबरच योगाचे काही प्रात्यक्षिक देखील करून दाखवले.आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून स्वा रा ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर्स, वैद्यकीय विद्यार्थी, अधिपरिचारिका तथा कर्मचारी बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय योगशिबिराच्या दरम्यान योग प्रशिक्षक डॉ ज्ञानोबा दराडे यांनी विविध प्रकारचे योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रशिक्षण दिले. तसेच योगासने केल्यामुळे शरीरातील सर्व स्नायू, हाडे व सांधे मजबूत होतात. संधिवातासारखे आजारसुद्धा कमी होऊन शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते.त्याचबरोबर प्राणायाम व ध्यान केल्यामुळे श्वसन संस्था याचे कार्य सुधारून हृदय सुद्धा निरोगी राहते असे डॉ ज्ञानोबा दराडे यांनी याप्रसंगी सांगितले. आजच्या धकाधकीच्या आयुष्यामध्ये ताण तणाव रोजच वाढत आहेत. अगदी छोट्या छोट्या कारणामुळे मारहाण, आत्महत्या यासारख्या घटना घडत आहेत.मात्र योग व प्राणायाम केल्यामुळे मन संतुलित होऊन मनाची व मेंदूची कार्य क्षमता वाढते .बुद्धी कुशाग्र होते व एकंदरीत विचारसरणी सकारात्मक बनते. त्यामुळेच योग हा सुखी, समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग असल्याचे परखड मत डॉ ज्ञानोबा दराडे यांनी या योगशिबिर प्रसंगी व्यक्त केले. त्यांनी वृक्षासन, ताडासन , भुजंगासन, धनुरासन , त्रिकोनासन शशांसन, उष्ट्रासन, चक्रासन आदी योगासनांचे प्रशिक्षण उपस्थित सर्वांना दिले. प्रत्येकाने शारीरिक मानसिक व सामाजिक आरोग्य चांगले राहावे यासाठी दररोज किमान ४५ मिनिटे योग अभ्यास तथा योगसाधना करण्याचे अवाहन डॉ दराडे तसेच अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी उपस्थितांना केले.

# शेतात राबते,कष्टते... राम-लक्ष्मणाची जोडी!

## छगन बोडखे आणि उत्तम बोडखे या बंधूंनी ’श्रमप्रतिष्ठा’ मुल्ये जपले

प्रतिनिधी @ आष्टी



माणूस कुठल्याही क्षेत्रात, कितीही मोठा झाला तरी मानवी समाज व्यवस्थेची मूल्य त्याने कायम जपली पाहिजेत असा संकेत आहे. आष्टी तालुक्यातील पत्रकारितेतील प्रगल्भ आणि शिक्षण क्षेत्रामध्ये संपूर्ण कुटुंब उच्चशिक्षित आणि स्वावलंबी जीवन जगत उर्वरित वेळेमध्ये गावाकडे जाऊन शेतात योगदान देणाऱ्या बंधूंची प्रेमळ कहाणी श्रमप्रतिष्ठा हे मूल्यं जपण्याबरोबरच प्रेरणास्थान ही बनत आहे.

छगन लक्ष्मण बोडखे आणि उत्तम लक्ष्मण बोडखे हे आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव या छोट्या गावातील बंधू आहेत. छगन बोडखे हे आपल्या शेतामध्ये प्रमाणिकपणे कष्ट, श्रम आणि घाम गाळून उदरनिर्वाह करतात तर त्यांचे लहान बंधू उत्तम बोडखे हे नामवंत वरिष्ठ पत्रकार आणि दैनिकाचे उपसंपादक आहेत. उत्तम बोडखे यांच्या सौभाग्यवती शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षिका आहेत तर मुलगी शिवानी डॉक्टर, राकेश हा मुलगा शिक्षक आणि दुसरा दत्ताभाऊ हा मुलगा अभियंता व प्रेसलाईनमध्ये आहे. उत्तम बोडखे यांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये अत्यंत सन्मानाचे स्थान आहे. किंबहुना तरीही कुठलाही बडेजाव न करता उपलब्ध वेळेमध्ये गावच्या शेतीमध्ये जाऊन मोठे बंधू छगन बोडखे यांच्या समवेत शेती कामे करण्यातून त्यांना मदत करून त्यांनी साधेपणाचे दर्शन घडवले आहे.

रविवारी सुट्टीच्या दिवशी उत्तम बोडखे आपले बंधू छगन बोडखे यांच्या समवेत शेतामध्ये भुईमुगाच्या शेंगा तोडण्याचे काम करून त्यांच्या साधेपणा आणि श्रमप्रतिष्ठा या मूल्यांवर शिक्कामार्फत केला आहे.

राम - लक्ष्मणाची जोडी!

आज एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव दिसून येतो. अशाही परिस्थितीमध्ये आपल्या गावाकडच्या शेतीत राबराब राबणाऱ्या मोठ्या बंधुबरोबर अत्यंत प्रेमळ चांगुलपणाची भावना ठेवत त्याला सहकार्य करून आनंदी जीवन जगण्याची पद्धती बोडखे कुटुंबीयांच्या माध्यमातून प्रेरणास्थान बनवत आहे. याबाबत छगन बोडखे यांनी अत्यंत प्रांजळपणे या बाबीला दुजोरा दिला.

# फडणवीस सरकारने धनगर आरक्षण प्रश्नी दिलेला शब्द पाळावा

## अन्यथा धनगर समाज नव्याने आंदोलन करणार- मल्हार योद्धा चंद्रकांत हजारे

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीला घेऊन मागील आठ ते नऊ महिन्यांपूर्वी लातूर येथे उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप लावला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी तत्कालीन शिंदे सरकारने सकारात्मक प्रतिसाद ही दिला होता. परंतु, फडणवीस सरकार सत्तेवर येवून आता दीडशे दिवस पूर्ण झाले आहेत. तरी परंतु, अद्याप ही याबाबत फडणवीस सरकार याप्रश्नी गंभीर नाही. बहुतेक निवडणुकीत आरक्षण देतो असे सांगून धनगर समाजाची मतं घेऊन सत्तेवर आलेल्या महायुती सरकारला दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. त्यामुळे महायुती सरकारने दिलेला शब्द पाळून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करीत आरक्षणाचा तिढा संपवावा. अन्यथा अन्यथा धनगर समाज नव्याने आंदोलन करेल असा इशारा धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे.

या प्रश्नी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन, उपोषण करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करून धनगड जमातीचे प्रमाणपत्र ही रद्द केली आहेत. त्यानंतर पुढे आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुद्दा उपस्थित झाला. परंतु, विधानसभा निवडणुक आदर्श आचारसंहिता लागल्याने तो तसाच प्रलंबित राहिला. तरीही धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा मुद्दा सतत लावून धरला होता. महाराष्ट्रात धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा बाजूला पडावा, समाजाला विसर पडावा म्हणून महायुती सरकारने त्यांच्या मर्जीतील धनगर समाजातील काही मोजक्या नेत्यांना लाल दिवा, मंत्री पदाचा दर्जा, सभापतीपद आणि आमदारकी बहाल केली आहे. धनगर समाज आरक्षण आंदोलनाचा फायदा याच मोजक्या धनगर नेत्यांना झाला आहे. संपूर्ण धनगर समाजाला नाही. हे मोजके नेते म्हणजे संपूर्ण धनगर समाज नव्हे असे मल्हार योद्धा चंद्रकांत हजारे यांनी सरकारला ठणकावून सांगितले आहे. जर धनगर आरक्षणाची महाराष्ट्रात अंमलबजावणी केली नाही तर धनगर समाजाला पुन्हा एकदा तीव्र आंदोलन उभे करावे लागेल असा इशारा आंदोलक हजारे यांनी महायुती सरकारला दिला आहे.

धनगर आरक्षणाची अंमलबजावणी करा : राज्यात धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी गेली काही महिन्यांपासून जोर धरून होती. त्यामुळे राज्यातील महायुतीच्या सरकारने मागणीसंदर्भात सकारात्मक असल्याचे सांगितले. दोन वेळा मंत्रालयात बैठका ही झाल्या. त्यातच आचारसंहिता लागली. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा पुढे ढकलण्यात आला. धनगर समाजाने मतदानरूपी दिलेल्या पाठिंब्यामुळेच राज्यात पुन्हा महायुती सरकार सत्तेवर आले आहे. हे विसरू नका, त्यामुळे महायुती सरकारने दिलेला शब्द पाळला पाहिजे. अन्यथा धनगर समाजाला पुन्हा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करावे लागेल याची केंद्र व राज्य सरकारने नोंद घ्यावी.

- चंद्रकांत हजारे,
(आंदोलक, धनगर समाज आरक्षण)

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



## ज्ञानसाधनेतील प्रा. डॉ. पूजा कडू यांची औषध निर्माण शास्त्रात दोन पुस्तके प्रकाशित.

परभणी/प्रतिनिधी

ज्ञानसाधना कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. सौ पूजा कडू यांची औषध निर्माण शास्त्रात इन्स्ट्रुमेंटल मेथड ऑफ अनालिसिस व बायोफार्मासिटिक्स आणि फार्माकायनेटिक्स या दोन विषयाची नुकतीच दोन पुस्तके प्रकाशित झालेली असून इंस्ट्रुमेंटल मेथड ऑफ अनालिसिस या विषयाचे प्रात्यक्षिका पुस्तक प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे. प्राध्यापिका डॉ कडू यांनी प्राप्त केलेल्या अमूल्य यशाबद्दल ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणीचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के सर व संस्थेच्या सचिव सौ. शितल सोनटक्के मॅम यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच ज्ञानसाधना फार्मसी महाविद्यालयाचे समन्वयक श्री डी व्ही सूर्यवंशी , प्राचार्य डॉ एम डी सलाउद्दीन , उपप्राचार्य श्री एन व्ही क्षीरसागर, विभाग प्रमुख सौ नजन ए ए , विभाग प्रमुख श्री पी एन काळे व सर्व विभागाचे प्रमुख या सर्वांनी त्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल अभिनंदन पर शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिवसेना पक्ष वाढवण्यात महिलांचा मोठा वाटा - आ.डॉ.राहुल पाटील



परभणी (प्रतिनिधी) : शिवसेना पक्ष वाढवण्यात महिलांचा मोठा वाटा आहे. महिलांच्या कणखर नेतृत्वामुळे शिवसेनेची पाळेमुळे घट्ट झाली. आगामी काळात महिला जिल्हा संघटक अंबिकाताई डहाळे यांच्या नेतृत्वात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेना (उबाठा) पक्ष मोठी झेप घेईल, असा विश्वास आमदार डॉ.राहुल पाटील यांनी व्यक्त केला. शिवसेना (उबाठा) पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशान्वये शिवसेना भवन येथून नवीन शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यासाठी परभणी जिल्हा महिला आघाडी संपर्क प्रमुख ज्योती ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व आ. डॉ. राहूल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे महिला जिल्हा संघटकपदी मनपातील माजी विरोधी पक्षनेत्या तथा महिला आघाडी विधानसभा संघटक अंबिका डहाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल आ. डॉ.पाटील यांच्या संपर्क कार्यालयामध्ये त्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ.डॉ. पाटील बोलत होते. यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख अर्जुन सामाले, उपजिल्हाप्रमुख संजय गाडगे, सदाशिव देशमुख, तालुका प्रमुख नंदू आवचार, संदीप झाडे, सुभाष जोंधळे, वंदना कदम, शहर प्रमुख ज्ञानेश्वर पवार, बाजार समिती संचालक अरविंद देशमुख, फैजुल्ला पठाण, प्रशास ठाकूर, युवासेना शहर प्रमुख विशु डहाळे, बाळराजे तळेकर, शेतकरी सेना जिल्हाप्रमुख उत्तम मुळे, जेष्ठ नागरीक मंच तालुकाध्यक्ष रामराव डोंगरे, विधानसभा प्रमुख दिनेश बोबडे, तालुका संघटक बंडू नाना बिडकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले, शिवसेना सातत्याने महिला सक्षमीकरणासाठी कार्य करत आहे. परभणी जिल्ह्यात देखील महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण देऊन शिलाई मशीन दिल्या आहेत. त्यांच्या स्वत:च्या पायावर उभे केले आहे. तसेच महिला सूतगिरणीच्या माध्यमातून महिलांसाठी रोजगार उपलब्ध करून देत आहोत. शिवसेना उबाठा पक्षात महिलांचे नेतृत्व बळकट व्हावे यासाठी मनपातील माजी विरोधी पक्षनेत्या अंबिका डहाळे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांना पक्ष कार्याचा मोठा अनुभव असून त्यांच्या नेतृत्वात निश्चितच जिल्ह्यात शिवसेनेत महिला कार्यकर्त्यांची संख्या वाढेल. त्यांच्याकडे संघटन कौशल्य आहे. त्यामुळे पक्षाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मोठा लाभ होईल असे आ.डॉ.पाटील म्हणाले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना जिल्हा संघटक डहाळे म्हणाल्या, आ.डॉ. राहूल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर आपली निवड करण्यात आली असून आपण ती सार्थ ठरऊन दाखवू मिळालेल्या संधीचे सोने करून दाखवण्याची वेळ आहे. शिवसेनेच्या महिला पदाधिकाजयांसह कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन निश्चितच आगामी वाटचाल करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## रविंद्र धर्मे यांची शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुखपदी निवड

परभणी/प्रतिनिधी

येथील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या परभणी जिल्हा प्रमुखपदी रविंद्र धर्मे यांची रविवारी (दि.२२) निवड करण्यात आली आहे.



जिल्हयातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने विविध पदाधिकार्यांच्या नियुक्या जाहिर केल्या आहेत. या नियुक्तीत परभणी जिल्हा प्रमुख म्हणून रविंद्र धर्मे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांचे कार्यक्षेत्र पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर आणि सेलू असल्याचे नियुक्तीपत्रात नमुद करण्यात आले आहे. या निवडीबद्दल रविंद्र धर्मे यांचे कार्यकर्त्यातून अभिनंदन होत आहे.


## नागरिकासाठी बांधलेली पिण्याच्या पाण्याची टाकी

पालम (प्रतिनिधी): पालम तालुक्यातील शेख राजूर येथील ग्रामपंचायत च्या वतीने बांधण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याची टाकी गावातील एका नागरिकांनी जमीन उद्धस्त केल्याने अशा नागरिकांवर गुन्हा दाखल करावा अशा मागणीचे निवेदन रंगनाथ कल्याणकर यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांच्याकडे केली आहे. पालम तालुक्यातील शेख राजुर ग्रामपंचायत अंतर्गत जलस्वराज योजनेमध्ये येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्यासाठी गावातील एका जागेमध्ये भव्य असे पाण्याची टाकी उभा करण्यात आली होती करण्यात आलेली टाकी ग्रामपंचायत, पाणीपुरवठा विभाग, पंचायत समिती प्रशासकीय यंत्रणेची पूर्व परवानगी न घेता तसेच संबंधित विभागाची पूर्वकल्पना देता गावातील ओमकार प्रसाद राव खेडकर यांनी जेसीबीच्या साह्याने उभी असलेली पाण्याची टाकी जमीन दोस्त केली आहे यामुळे येथील गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावणार असून तसेच शासनाने टाकी बनण्यासाठी लाखो रुपये खर्च केलेले पाण्यात गेले असून अशा ग्रामस्थांवर शासनाने त्वरित कारवाई करावी अशा मागणीची निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे अन्यथा कारवाई न झाल्यास उपोषणाला बसण्यास बसणार असल्याचेही देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे

# पूर्णेत अंधाराचे साम्राज्य!

पूर्णा (प्रतिनिधी) पूर्णा शहराचा मुख्य रस्ता जो दररोज हजारो नागरिकांचा प्रवासमार्ग आहे, तो गेल्या अनेक दिवसांपासून अंधारात गडप झाला आहे शहरातील बस स्टँड, अभिनव शाळा चर्च परिसर, व्यापारी संकुल, आनंद नगर या भागांतील अनेक स्ट्रीट लाईट्स बंद असून रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पहावयास मिळत आहे रस्त्यावरून चालणं म्हणजे जिवावरचा धोका बनला आहे.

या अंधाराच्या साम्राज्यात नागरिकांनी अपघात, चोरी,यांचा सामना करावा लागत आहे.परीसरतील नागरीकांना मध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे विशेष म्हणजे ही समस्या नवीन नाही महिन्यांपासून सुरू आहे.पण या गंभीर प्रश्नांकडे नगरपालिकेचे मुख्य अधिकारी व संबंधित विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांतून सांगण्यात येत आहे शहरात लाखो रुपये खर्च करून स्टेट लाईट बसवण्यात आलेत मात्र काही प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणात स्ट्रीट लाईट बसवले परंतु अध्यापही लाईटची सुविधा करण्यात आली नाही नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी देऊन सुद्धा नगरपालिका प्रशासनाकडून कुठलीच कारवाई करण्यात नसून शहराच्या सुरक्षेसाठी उभारलेली स्ट्रीट लाईट व्यवस्था केवळ खांबांपुरती मर्यादित राहिली आहे. काही ठिकाणी लाईट लावूनही



ती कधीच सुरू होत नाही, तर मुख्य रस्त्यावर दोन दिवस लाईट चालू राहते आणि मग आठवडाभर बंद!

शहरातील पथदिवे सुरू ठेवणे ही प्राथमिक आणि मूलभूत सेवा असूनही, नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांचा या समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन संपूर्णपणे निष्क्रिय आणि बेजबाबदार आहे. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही, त्यांच्या बाजूने कोणतीही ठोस कृती होत नाही. नगर नगरपालिकेच्या नियोजन शून्य कारभाराला अक्षरशा नागरिक वैतागले आहेत प्रभागांमध्ये फक्त खांब उभे केले आहेत. लाईट सुरूच नाही. लाखोंचा खर्च कुठे गेला? करणारे कर्मचारी केवळ नावापुरते? नोंदी तयार होतात, फोटो काढले जातात, पण लाईट पेटत नाहीत. या सगळ्यामागे कोणाचा आर्थिक फायदा आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे सध्या पावसामुळे गटारे ओसंडून वाहत आहेत, साप, इच्यांसारखे प्राणी रस्त्यावर येत आहेत. लाईट नसल्यामुळे हे प्राणी दिसत नाहीत. नागरिकांच्या पायाखाली साप आल्याचे प्रकार घडले आहेत. हा केवळ अंधाराचा नाही, तर जीवित सुरक्षेचा प्रश्न आहे. या गंभीर प्रश्नांकडे नगरपालिकेने तात्काळ लक्ष देऊन शहरातील मुख्य रस्त्यावरील व प्रभागांमधील स्ट्रीट लाईट तात्काळ सुरू करण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून पुढे येत आहे

## महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण, नंतर कार्यालयात तोडफोड

प्रतिनिधी @ पाटोदा

आज दुपारी महिवितरण कार्यालयात एका कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आली आणि त्यानंतर आरोपीनेच कार्यालयात घुसून मोठ्या प्रमाणात कार्यालयाची तोडफोड केली. प्राथमिक माहितीनुसार,बिलासंदर्भात सुरू असलेल्या वादातून एका गुत्तेदाराने महावितरण कर्मचाऱ्याशी वाद घालून त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. यानंतर संबंधित गुत्तेदाराने संतापाच्या भरात कार्यालयातील फर्निचर, संगणक, फायली व अन्य कागदपत्रांची नासधूस केली. या तोडफोडीत महावितरणच्या शासकीय संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले



आहे.घटनेनंतर महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कार्यालयात काही काळ कामकाज ठप्प झाले. मारहाण झालेल्या कर्मचाऱ्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पाटोदा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## रुईनालकोल येथील महेश देवस्थान व शेख महंमद बाबा देवस्थानास माजी आ.भीमसेन धोंडे यांच्यातर्फे गणेश अश्व अर्पण

प्रतिनिधी @ आष्टी

पंढरपूरचे विठ्ठल हे सर्वांचे दैवत आहे. आपल्या सुख दुःखाच्या प्रसंगी विनम्र भाव ठेवून नतमस्तक होण्यात माणूस धन्यता मानतो. सद्यस्थितीत विविध भागातून वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरीकडे प्रस्थान करीत आहेत. दरम्यान भीमसेन धोंडे यांचे जन्मगाव असलेल्या रुईनालकोल येथील देवस्थान व पायी दिंडीसाठी पांढरा शुभ्र गणेश नावाचा अश्व अर्पण केला. रुईनालकोल गावात सोमवारी वाजत गाजत मिरवणूक करुन एका कार्यक्रमात हा अश्व अर्पण केला. आठवड्यापुर्वीच श्री क्षेत्र गहिनीनाथगडासाठी माजी आ. भीमसेन धोंडे यांनी दोन अश्व अर्पण केले होते.भीमसेन धोंडे यांना त्यांच्या जन्मगावचे वारकरी व ग्रामस्थ काल रविवारी भेटले व त्यांनी गावातील दोन्ही देवस्थानासाठी एका अश्वची मागणी केली. भीमसेन धोंडे यांनी तात्काळ ती मागणी मान्य करीत तुम्ही गावकरी मंडळीने हा अश्व सांभाळावा अशी सुचना दिली. सोमवारी कराड येथुन आतापर्यंत ज्या अश्वावर सवारी न झालेला गणेश नावाचा अश्व आणला. माजी आमदार भीमसेन धोंडे यांनी अत्यंत पवित्र मनाने हा अश्व अर्पण केला. या अश्वाच्या स्वागत मिरवणूकीत धोंडे सहभागी झाले. दि.२७ जुन रोजी रुईनालकोल ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. अत्यंत पवित्र पंढरीच्या विठुरायाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी जाणाऱ्या वारकरी, भाविक भक्तांत हा अश्व दिल्याने चैतन्य आले व उत्साह वाढला.

यावेळी बोलताना माजी आ. भीमसेन धोंडे म्हणाले की, घोड्याची सेवा श्रीकृष्ण देवाने केलेली आहे. अर्जुनाचे घोडे देवाने धुतले आहेत. हे विसरु नका. हा गावाचा घोडा आहे. सर्वांनी या घोड्याची सेवा व पुजा करावी. रुईनालकोल येथुन २७ जुन रोजी पंढरपूर पायी दिंडी सोहळा प्रस्थान होत आहे. त्यात हा गणेश घोडा जाणार



आहे. पांडुरंगाच्या कृपेने सर्वसामान्यांची मनोभावे सेवा करण्याची शक्ती, बळ आणि ऊर्जा येऊ दे अशी प्रार्थना यावेळी केली. यावेळी माजी सरपंच संजय नालकोल यांनी प्रस्ताविक केले. यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, बबनराव औटे, पाटोदाचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, ह. भ. प. दिनकरराव तांदळे यांचे भाषणे झाले. यावेळी सरपंच तात्यासाहेब नालकोल, उपसरपंच विष्णू मांढरे, उपसभापती नामदेव धोंडे, माजी सरपंच संजय नालकोल, प्रा. संजय धोंडे, प्रा. श्रीकांत धोंडे, राजेंद्र धोंडे, माजी प्राचार्य आजिनाथ बोडखे, प्राचार्य उत्तम भुकन, प्राचार्य दादासाहेब काळे, सागर फरांडे, ज्ञानेश्वर पुंड, ह. भ. प. सुरेश महाराज नालकोल, बबन ढवळे, हरिभाऊ खोडके, हनुमंत सासोडे, अनिल गजघाट, शांतीलाल खिलारे, आजिनाथ कन्हेरकर, आजिनाथ हिंगणे, योगेश फरांडे, नानाभाऊ आडकर, सर्जेराव नालकोल, रंगनाथ बनसोडे, आनंदराव बनसोडे, परमेश्वर गांजुरे, सुरेश आडकर, हरिभाऊ दळवी गावातील सर्व ग्रामस्थ याठिकाणी उपस्थित होते.

भीमसेन धोंडेंचा साधेपणा आणि अध्यात्म दृष्टीने वारकरी आनंदी!

माजी आमदार भीमसेन धोंडे हे बलाढ्य व्यक्तिमत्व आहे. चार वेळा आमदार राहिलेले आणि विविध शैक्षणिक संस्था, बँका अशा मोठ्या साधन संपत्तीचे मालक आहेत परंतु त्यांच्या माध्यमातून जनसामान्यांसाठी स्वावलंबी

### नीट,जेईई-२०२५ साठी पात्र झालेल्याशाळेतील विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केले मत

## शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेचे अल्पावधीत ६० पेक्षा जास्त मुले एमबीबीएस साठी पात्र,कमी कालावधीतील हे विक्रमी यश - रमेशराव आडसकर

प्रतिनिधी @ केज

इंग्लिश स्कूल केज या शाळेचे नीट २०२५ परीक्षेत एमबीबीएस या अत्युच्च अभ्यासक्रमा साठी पात्र ठरलेल्या तसेच जेईई मध्येउत्कृष्ट गुण घेणाऱ्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे सचिव श्री. रमेशरावजी आडसकर यांच्या हस्ते आज करण्यात आला.या प्रसंगी विद्यार्थ्यांबरोबर आई वडील,नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.सर्वांचा यथोचित सत्कार करण्यातआला. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये छएएढ-२०२५ मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने प्रत्यूष ठोंबरे ५७०(-खठ ५५४६), आर्यन शिंदे ५३३,मुंडे अभिजीत ५१८, देवयानी थोरात ४९९, तर गएए-चक्कउएढ मध्ये अदिती शिनगारे ९८%,यश डुबे ९५ %, टोणगे अनिकेत ९५ %, संयुक्ता वडगावकर ९२ %,श्रेयस पाटील ९५%, अल्फिया शेख ९०% या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.याप्रसंगी आपले विचार मांडताना श्री. रमेशराव आडसकर यांनी सांगितले की, शारदा इंग्लिश स्कूल या शाळेची स्थापना २०१० मध्ये करण्यात आली. प्रथम वर्गापासून सुरू करण्यात आली.शाळने आपल्या नावाचा शैक्षणिक वर्तुळात एक वेगळा पॅटर्न निर्माण केला.नंतरच्या काळा मध्ये दहावीचा वर्ग सुरू झाल्यानंतर केवळ आठ बॅचेस बाहेर पडलेले असताना इतक्या कमी कालावधीमध्ये केवळ एमबीबीएस सारख्या एका अभ्यासक्रमास ६० पेक्षा जास्त मुलांची निवड होणे म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे द्वार खुले करून देणे आहे असे म्हणता येईल असे सांगताना काही कालावधीपूर्वी डॉक्टर होण्याचे प्रमाण परिसरा मध्ये अत्यल्प होते,परंतु शारदा इंग्लिश स्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी



एक वेगळा उच्चांक स्थापन केला असल्याचे सांगितले.याचबरोबर जेईई परीक्षा असो, सीईटी परीक्षा असो शाळेच्या शेकडो विद्यार्थ्यांनी अत्यंत मेहनतीने प्रतिष्ठित अशा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये किंवा इतरअभ्यासक्रमा मध्ये प्रवेश मिळवूनयश संपादन केले आहे. इतकेच नव्हे तर शाळा स्थापनेनंतरच्या इतक्या कमी काळामध्ये शाळेचे विद्यार्थी आज देश विदेशात शहराचे, तालुक्याचे नाव मोठे करत आहेत.असे मत त्यांनी मांडले.याच बरोबर सर्व सर्व डॉक्टर विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ततेनंतर गोरगरीब जनतेची सेवा करावी अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी नवनवीन शोध लावावेत व परिसराचेआई-वडिलांचे नाव मोठे करावे किंबहुना हे करतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.याप्रसंगी पालकातर्फे श्री.फुलचंद ठोंबरे यांनी आपले विचार मांडताना शाळेने लावलेल्या शिस्तीमुळे, अध्यापनामुळे हे प्रचंड यश विद्यार्थ्यांनामिळाले असे सांगताना आडसकर परिवाराने सर्वच क्षेत्रांमध्ये जनतेची सेवा केली त्याचप्रमाणे शारदा इंग्लिश स्कूल केज या शाळेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रामध्ये शाळेच्या माध्यमातून क्रांती केली असे विचार मांडले व शाळेचे आभार व्यक्त केले.यावेळी रणजीत आडसकर,शाळेचे प्राचार्य मिश्रा एस.एम, उपप्राचार्य सुरज सनी, देशमुख पी.एम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.सूत्रसंचालन श्री. शेटे प्रदीप यांनी केले, नियोजन व व्यवस्थापन व्यवस्थापनाचे काम ऋषिकेश ढगे यांनी पाहिले,तर आभार प्रदर्शन श्री.बाबर सर यांनी केले.याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर व उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या नुकसानीसाठी तात्काळ पंचनामे करून भरपाई देण्याबाबत मागणी

प्रतिनिधी @ पाटोदा

दि. ११ जून २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा व शिरूर या तीन तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या शेतमाल, कांदा, फळबागा, जनावरे, गोठे आणि राहत्या घरांचा प्रचंड नाश झाला आहे. या घटनेमुळे बऱ्याच शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुसकान झाले असल्याने सर्वांनाच फटका बसला आहे.सद्य परिस्थितीत, शेतकऱ्यांना मानसिक आणि आर्थिक धक्का बसलेला आहे. ते अनेक संकटांचा सामना करत आहेत आणि त्यांना त्वरित मदतीची आवश्यकता आहे. पिकांच्या नुकसानीसोबतच, गोठ्यांची आणि घरांची हानी शेतकऱ्यांच्या कुटुंबावर मोठा परिणाम करत आहे. या आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे आयुष्य अत्यंत कठीण झाले आहे.या नुकसानाचे पंचनामे त्वरित पूर्ण केले जावेत आणि शेतकऱ्यांना त्यानुसार भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे आणि न्यायाचे मिळावे यासाठी



तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली. त्यामध्ये सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी त्वरित निर्णय घेईल. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि ते पुन्हा आपल्या शेतावर काम करू शकतील. अशी अपेक्षा व्यक्त करून सरकारने तात्काळ लक्ष देऊन शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करून आवश्यक ती भरपाई दिली जावी अशी विनंती केली.

# आष्टीतील नंदनवन पार्क ही वसाहत लवकरच पूर्ण होणार - आ.सुरेश धस यांचा आत्मविश्वास

प्रतिनिधी @ आष्टी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील पंतप्रधान आवास योजना द्वारे गोरगरीब जनतेचे स्वतःच्या हक्काचे घर असावे हे स्वप्न पूर्ण होत आहे. कुंडलिक सोनटक्के यांनी ग्रामीण भागामध्ये दर्जेदार घरे निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. जन्मभुमीत अद्ययावत सुसज्ज आणि सर्व सुविधांनी युक्त अशी नंदनवन पार्क ही वसाहत लवकरच पूर्ण होणार असा आत्मविश्वास आ. सुरेश धस यांनी व्यक्त केला.

आष्टी तालुक्यातील जामगाव येथील मूळ रहिवासी असलेले पुणे येथील यशस्वी बांधकाम व्यावसायिक कुंडलिक सोनटक्के यांनी आपल्या जन्मभुमीत नंदनवन पार्क येथे अत्यंत चांगल्या पद्धतीने दर्जेदार सिमेंट रस्ते, चिल्ड्रन्स पार्क, खेळाचे साहित्य आणि कम्युनिटी हॉल असलेल्या वसाहतीच्या भुमीपुजन प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, स्वतःचे हक्काचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते



आणि गोरगरीब जनतेमध्ये घराचे बांधकामासाठी अनेक अडचणी येत असतात त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी पंतप्रधान आवास योजना निर्माण केली आणि गोरगरिबांच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. त्यामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांना या योजनेद्वारे घरे उपलब्ध झाली असून आष्टी तालुक्यामध्ये एकूण १८ हजार घरकुले मंजूर झाले आहेत. आष्टीलगत मुर्शदपूर ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरकुले मंजूर झाले आहेत. गुंठेवारी मुळे निर्माण झालेली समस्या यावर उपाययोजना करण्याचा आपण प्रयत्न करत असून याबाबत लवकरच जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली असल्याची सांगत ते म्हणाले की, कुंडलिक सोनटक्के हा जामगावसारख्या ग्रामीण भागातून सुरुवातीला ऊसतोडणी चे काम केल्यानंतर रोजगारासाठी पुणे शहरात जाऊन लाईट फिटिंगच्या कामाबरोबरच बांधकामाचे प्रशिक्षण घेऊन छोटे - छोटे बांधकाम घेऊन आज यशस्वी बांधकाम उद्योजक म्हणून त्यांनी नाव कमावले आहे. त्याने घेतलेले परिश्रम मेहनत आणि कष्ट यातून त्याने मोठे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी या कुंडलिक सोनटक्के यांच्या जीवन प्रवासाचा अभ्यास करावा आणि त्यांचा आदर्श घेऊन जीवनामध्ये यशस्वी कसे व्हावे हा मंत्र त्यांच्याकडून शिकावा असे त्यांचे आदर्शवत जीवन आहे. त्यांनी आपल्या जन्मभुमीत येऊन कर्तव्य समजून आष्टी येथील नंदनवन पार्क द्वारे सुसज्ज अध्यायावत वसाहत निर्मितीचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी इंजि. किशोर हंबर्डे, चेअरमन आदिनाथ सानप, सेवानिवृत्त तहसीलदार शहादेव गिते,

# मराठवाड्यातील रेल्वे प्रश्नांसंबंधी खा.सौ. रजनीताई पाटील यांनी मांडले अभ्यासपूर्ण विवेचन

प्रतिनिधी @ केज

पुणे येथील रेल्वे समिती च्या बैठकीत मराठवाड्यातील विविध रेल्वेमार्गाच्या प्रश्नावर खा.सौ.रजनीताई पाटील यांनी प्रश्न मांडले घाटनांदूर-अंबाजोगाई-केज-नेकनूर- मांजरसुंभा-पाटोदा-आष्टी-जामखेड-कर्जत-श्रीगोंदा(दौंड) रेल्वे मार्ग (संरक्षण मंजूरसर्वेक्षण) सोलापूर- तुळजापूर-धाराशिव - लातूर - अंबाजोगाई-परळी - सोनपेठ-पाथरी- मानवत-पाचलेगाव- जिंतूर-औंढा नागनाथ - नरसी - हिंगोली मार्ग, परळी,लातूर रेल्वे स्थानकावरून योग्य रेल्वे मार्ग जोडून व्यावसायिक आणि पर्यटन क्रियाकलाप वाढविण्यासाठी मराठवाडा मागास प्रदेशाला विदर्भ आणि उत्तरभारताशी म्हणजेच दिल्ली,राजस्थान, पंजाब,हरियाणा,जम्मू आणि काश्मीर, मध्यप्रदेश इत्यादींशी



जोडणे.विकाराबाद- बिदर-लातूर-कुर्डुवाडी हा मार्ग/ट्रॅक गेल्या दहा वर्षांपासून सुरू झाला आहे,अजूनही खूपकमी प्रवासी गाड्या आहेत. या मार्गाचा वापर नवीन गाड्यांसाठी केला जाऊ शकतो ज्या विशाखापट्टणम, विजयवाडा,हैदराबाद ते मुंबई/पुणे दरम्यानधावू शकतात.आदी विषय मांडले.लवकरच नवीन रेल्वे मार्ग मंजूर होतील असे महाप्रबंधक यांनी सांगितले.यावेळी सोलापूर,पुणे, मराठवाडा भागातील मराठवाड्यातील खासदार यांची उपस्थिती होती.



ग्रामीण रुग्णालय आष्टी येथील वाहन चालक श्री. सुदर्शन कुटे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करतांना श्री. राजेंद्र लाड सर, श्री. डॉ. राहूल टेकाडे साहेब, श्री. डॉ. सुरेश ढाकणे साहेब, सरपंच श्री. विठ्ठल राख, पत्रकार श्री. अक्षय विधाते, श्री. रमेश फुंदे, श्री. परमेश्वर तावरे, श्री. रामेश्वर मिसाळ दिसत आहेत.

# राज ससाणेंना पदोन्नती

प्रतिनिधी @ मानुर

शिरुर कासार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले राज ससाणे यांची पोलीस जमादार म्हणून मंगळवार (दि.१७) रोजी पदोन्नती झाली. पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. गेल्या दोन वर्षापासून शिरूरकासार पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले राज ससाणे हे शिरूरमध्ये आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे सर्व परिचित झाले आहेत. राज ससाणे यांनी बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी नोकरी करत असताना आपल्या कामाच्या जोरावर सर्वांना आपलेसे करून सगळ्यात मिळून मिसळून राहून आपली कामे चोख



करून आपल्या कार्याच्या जोरावर समाजात आपली चांगली छबी निर्माण केली आहे. त्यामुळे पोलीस जमादार म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जीवन विकास शिक्षण मंडळ,केज संचलित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ सोहळा संपन्न

## ध्येयप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांची इच्छाशक्ती प्रबळ असली पाहिजे - प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे

प्रतिनिधी @ केज

सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे या स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर विद्यार्थ्यांनी मानसिक व शारीरिक दृष्ट्या सबल असले पाहिजे.तसेच ध्येय प्राप्तीसाठी नेहमी सकारात्मक राहिले पाहिजे.आपल्याला काय व्हायचंय हे विद्यार्थ्यांनी आत्ताच ठरवले पाहिजे.मोठी स्वप्ने पाहत असताना, स्वप्न हे झोपेत नव्हे तर ते उघड्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे.या जगा मध्ये सर्व काही शक्य आहे परंतु आपली इच्छाशक्ती तितकी प्रबळ असायला हवी. समाजातील प्रत्येक घटक हा महत्त्वाचा आहे.क्षेत्र कुठलेहीअसो तेंव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता विकसित केल्या पाहिजेत.यशस्वी होण्यासाठी महा पुरुषांचे विचार आपण आत्मसात केले पाहिजेत.जगातील सगळी युद्धे केवळ शस्त्रांच्या व सैनिकांच्या बळावर जिंकली गेली नसून ती सैन्यांच्या मनोबळावर जिंकली गेली.कोणतीही गोष्ट अशक्य नाही,परंतु आपल्याकडे उत्तुंग इच्छाशक्ती व आत्म विश्वास असला पाहिजे. शिक्षण व्यवस्थेत जरी बदल होत असले तरी गुरु हा तितकाच महत्त्वाचा घटक आहे. गुरु म्हणजे शिक्षण व्यवस्थेचा कणा आहे. महाराष्ट्रामध्ये लातूर पॅटर्न जसा प्रसिद्ध आहे,तसे या शाळेने शिक्षण क्षेत्रात केज पॅटर्न निर्माण केलेला आहे.असे प्रतिपादन लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी केले.

केज येथील जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित,स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (मा.वि.) तसेच स्व. प्रमोद महाजन कला व विज्ञान कनिष्ठ महा विद्यालय या शाळेतील दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील तसेच वैद्यकीय क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ सोहळा संपन्न झाला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ केज संस्थेचे अध्यक्ष श्री. अंकुशरावजी इंगळे तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे हे उपस्थित होते.इतर मान्यवरांमध्ये जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे सचिव श्री.गिन्यानदेव गदळे, सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे प्राचार्य उपेंद्र कोकीळ,कोषाध्यक्ष फजिलोद्दीन काजी, संचालक नारायण अण्णा अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या



अध्यक्षा सौ.शैलाताई इंगळे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शिवनंदामुळे,सेवानिवृत्त मु.अ.डोईफोडे सर, प्रा.वि.चे मु.अ.वसंत शितोळे,प्राचार्य शंकर भैरट,स्वयंअर्थसहाय्यीत चे मु.अ.संघपाल मस्के आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभीस मान्यवरांचे स्वागत परंपरागत वंदनीय अभ्यागतम,सुस्वागतम या स्वागत गीताने शाळे तील सहशिक्षक प्रबोधकांत समुद्रे सर व इ.७ वीतील विद्यार्थ्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वपाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव जी.बी.गदळे यांनी दिला.याप्रसंगी ते म्हणाले,मागील ३५ वर्षांपूर्वी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. दरवर्षी शाळेचा निकाल १०० टक्के असून १० ते १२ विद्यार्थी वैद्यकीय व अभियांत्रिकी तसेच इतर क्षेत्रांमध्ये यशस्वी होतात.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दहावी परीक्षेतील ९५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविलेल्या एकूण ६२ गुणवंत विद्यार्थ्यांसह बारावी बोर्ड परीक्षेतील व इतर २२ अशा एकूण ९५ गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पालकांसह सत्कार करण्यात आला.यावर्षी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून शाळेतून तांबारे वैष्णवी चंद्रशेखर,चाटे समिक्षा सचिन,मुंडे सुरज भाऊराव,सय्यद जोया फातेमा जूबेर,कदम शंभूराजे भागवतराव, शिंदे शाश्वती पुरुषोत्तम या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० टक्के गुण मिळवून तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला तर डोईफोडे शालिनी प्रकाशराव,सत्वधर हर्षा दत्ता या ९९. ८० टक्के गुण मिळवून द्वितीय आल्या.तर हरणमारे शाहिद सय्यद हा ९९.४० टक्के गुण मिळवून तृतीय आला तसेच स्व.प्रमोदमहाजन कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा ही निकाल १०० टक्के लागला असून कुरेशी अफशा ८६ टक्के गुण मिळवून प्रथम,कुरेशी शिफा ८५. ३३ टक्के द्वितीय,तर कुरेशीहुजेफ ८१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून तृतीय आला.तसेच एम.बी.बी.एस.साठी निवड झालेले विद्यार्थी- दांगट श्रेयश भीमा, मोहिते स्वप्निल दिनकर, नानजकर ओमकार दिपकराव,जाधव ओमकार सतीशराव, थोरात वेदांत लक्ष्मणराव,बोबडे विवेक महादेव,नेटके अभयराजे महादेव, शर्मा समृद्धी संतोषराव, गुंड भक्ती संतोषराव, मोरे साक्षी किशोर इत्यादी.नीट युजी २०२५ मधील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी- चौरे शितल अरविंद,शेटे तुषार बालासाहेब,चाटे ऋतुजा दत्तात्रय,भराडे आदित्य अंगद,गिते प्रविण सतीश,काकड शुभम संजय,हांगे अंकिता फुलचंद,राऊत संस्कृती सचिन,चाटे श्रेया लक्ष्मण इत्यादी.

अध्यक्षीय समारोपात संस्थेचे अध्यक्ष श्री. अंकुशरावजी इंगळे म्हणाले की,१९८५ मध्ये या संस्थेची स्थापना झाली.त्यावेळी मोजक्याच संस्था परिसरात होत्या.तेंव्हा पासून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली.ते म्हणाले,विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात ध्येय निश्चित करून करिअर घडविण्यासाठी जिद्द, चिकाटी व परिश्रम यांची जोपासना केली पाहिजे.तसेच शाळेचा गुणात्मक व संख्यात्मक आलेख असाच टिकून राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.याप्रसंगी सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक यांचेही अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार शाळेच्यामुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी मानले.

# 'आई सेंटर प्रो' ही विक्रमवीर घडविणारी संस्था - ऍड.राहुल बनसोडे

## अंबाजोगाईत गुणवंतांचा सत्कार व करिअर विषयक मौलिक मार्गदर्शन

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

'प्रत्येक व्यक्तीमध्ये एक विशिष्ट प्रतिभा असते. ती वेळेवर ओळखून योग्य मार्गदर्शनाच्या आधाराने विकसित केली, तर तीच प्रतिभा विक्रमांचे शिखर गाठते,' असे स्पष्ट, प्रभावी आणि प्रेरणादायी विचार सुप्रसिद्ध विधिज्ञ व अभ्यासू वक्ते ऍड.राहुल बनसोडे (नाशिक) यांनी व्यक्त केले.

नालंदा फाऊंडेशन, बीड आणि आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित गुणवंत सत्कार व करिअर मार्गदर्शन सोहळ्यात ऍड.बनसोडे हे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, 'स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी केवळ शैक्षणिक गुणवत्ता पुरेशी नसते, तर स्वतःवरील विश्वास, जिद्द, सातत्य आणि ध्येयासाठीची निष्ठा यांचे संयोजन आवश्यक असते. आपली चमक दुसऱ्यावर अवलंबून न ठेवता स्वतःच निर्माण करावी लागते.' यावेळी ऍड.बनसोडे यांनी विधी क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले. कायदाशास्त्र हे केवळ वकिलीपुरते मर्यादित नसून, न्यायसंस्था, प्रशासन, मानवी हक्क, सल्लागार सेवा, आंतरराष्ट्रीय कायदा आणि संशोधन या क्षेत्रांतही मोठ्या प्रमाणात




करिअरच्या संधी उपलब्ध आहेत, हे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमात 'द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड' अंतर्गत विक्रम नोंदविणाऱ्या गुणवंतांचा विशेष सत्कार करण्यात आला. याबाबत बोलताना ऍड.बनसोडे म्हणाले, 'या रेकॉर्डधारकांनी त्यांच्या अंगभूत प्रतिभेच्या जोरावर हे शिखर गाठले आहे. ते हेच दाखवते की योग्य संधी, दिशादर्शक मार्गदर्शन आणि स्वतःचा आत्मविश्वास यांचे संमीलन झाल्यास प्रत्येक व्यक्ती विक्रमवीर बनू शकतो.' 'आई सेंटर प्रो' ही संस्था केवळ शिक्षणाचे केंद्र नसून, विश्वविक्रमवीर तथा ऍमेझॉन बेस्ट सेलिंग लेखक सर नागेश जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांतील सुप्त क्षमता ओळखून त्यांच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडवून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती मिळवून देणारा एक जागतिक मंच आहे, असे गौरवोद्गार काढून आयोजक संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या प्रेरणादायी सोहळ्यात शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदीप रोडे, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, सर नागेश जोंधळे, प्रा.राम गायकवाड, राजेंद्र घोडके, जगन सरवदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी 'आई सेंटर प्रो - द डायनॅमिक कम्युनिकेटर' आणि 'आई सेंटर प्रो - चॅम्पियन' या उपक्रमांतर्गत इंग्रजी भाषेवर विशेष प्रभुत्व असलेले सर नागेश जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली ३१ दिवसांत हमखास खात्रीने इंग्रजी बोलण्यासाठीचे आव्हान यशस्विरीत्या पूर्ण केलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना सन्मानचिन्ह, ग्रंथ, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले व सोबतच दहावी-बारावी मध्ये यश मिळविलेल्या गुणवंतांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विकास वाघमारे यांनी केले. तर सुत्रसंचलन राहुल सुरवसे यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ.किर्तीराज लोणारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नालंदा फाऊंडेशन, बीड आणि आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने पुढाकार घेण्यात आला.



# अरण्यऋषी मारुती चितमपल्ली म्हणजे अरण्य परिसंस्थेचे दीपस्तंभ - डॉ.नवनाथ काशीद

प्रतिनिधी @ केज

जंगल हे फक्त सौंदर्याचे ठिकाण नसून वनातील सूक्ष्म निरीक्षणाद्वारे जैव विविधतेचा अभ्यास करून जंगलातील अद्भुत विश्व उभारणारे पद्मश्री मारुती चितमपल्ली म्हणजे अरण्य परिसंस्थेचे दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन डॉ.नवनाथ काशीद यांनी केले.ते मारुती चितमपल्ली यांच्या आदरांजली कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब पाटील अध्यापकमहा विद्यालयाचे प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर हे होते.तर मसाप केजचे सचिव राहुल गदळे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ मान्यवरांच्या हस्ते महा विद्यालयाच्या मैदानावर वृक्षारोपन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.सौदागर म्हणाले की, अभ्यासूंनी प्रकटावे या उक्तीप्रमाणे पद्मश्री मारुती चितमपल्ली यांनी स्वःअनुभवातून अरण्यातील संबंध विश्व जगासाठी उलगडून दाखवले आहे.याची साक्ष आपणांस त्यांनी लिहिलेल्या पक्षीकोश, प्राणीकोश,मत्स्यकोश, रणवाटा,आनंददायी बगळे,चकवा चांदण इ. साहित्यातून दिसून येते. मारुती चितमपल्ली यांचे जाणे निसर्ग अभ्यासकांसाठी न भरून येणारी हानी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मराठवाडा साहित्य परिषद केजचे नवनियुक्त अध्यक्ष प्रा. डॉ.नवनाथ काशीद व सचिव राहुल गदळे यांचा त्यांच्या निवडी बद्दल वृक्ष देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नागेश कराळे तर आभार प्रा. डॉ.महादेव सुवर्णकार यांनी मानले.यावेळी श्री.सुजित नाईकवाडे, शिक्षकेत्तर कर्मचारी सतीश नेहरकर,अरविंद गायसमुद्रे यांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर - डॉ.आबासाहेब देशमुख

प्रतिनिधी @ बार्शी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसारविद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच व्यवसाय शिक्षण,कौशल्यविकास,नेतृत्व विकास,मूल्य शिक्षण,उद्योजकता, कार्यानुभव,प्रशिक्षण, ऑन- दि- जॉब ट्रेनिंग, प्रात्यक्षिके,प्रोजेक्टवर्क, ऑनलाइन एज्युकेशन इत्यादींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आलेला आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राचार्यमहासंघाचे अध्यक्ष व अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख यांनी केले.ते बार्शी येथील एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्च तर्फे आयोजित एज्युकेशन समिट ऑन नॅशनल एजुकेशन पॉलिसी २०२० च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर लेंगरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे उद्घघाटन प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख,श्री.वेंकटेश गंभीर,डॉ.श्रीकांत कलुरकर व प्राचार्य डॉ.मधुकर लेंगरे त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची ध्येय व उद्दिष्टे तसेच राष्ट्रीय पातळी वरील शिक्षण संस्थांची नवीन संरचना,देशातील सर्व विद्यापीठे व महा विद्यालयांना समान शैक्षणिक धोरण व समान आराखडा, संशोधन व विकासाला चालना,औद्योगीकरण, व्यवसाय व उद्योगधंद्या साठी प्रशिक्षित मनुष्य बळ निर्माण करणे, व्यवसाय शिक्षण, कौशल्य विकास व मूल्य शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा परिपूर्ण विकास करणे व त्याची सर्वांगीण जडणघडण करून त्याला स्वावलंबी बनवणे इत्यादी महत्त्वाचे उद्दिष्ट या नवीन शैक्षणिक पद्धती मध्ये ठेवण्यात आलेली असून याद्वारे भारत देश ग्लोबल नॉलेज सुपर पावर (विश्वगुरु) बनवणे हे या शैक्षणिकधोरणाचे अंतिमउद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे.हे धोरण राबविताना संस्था, महाविद्यालये,शिक्षक,




शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालकां नाही अनेकअडचणीला सामोरे जावे लागणार आहे.परंतु हळूहळू शासनाच्या माध्यमातून आलेल्या अडचणी दूर करून हे शैक्षणिक धोरण यशस्वीरित्या राबवणे ही काळाची गरज आहे असेही ते पुढे म्हणाले.या कार्यक्रमात टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च मुंबई या संस्थेचे सेवानिवृत्त वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. व्यंकटेश गंभीर,पुणे येथील लेवलअपसंस्थेचे संचालक डॉ.श्रीकांत कल्लूरकर,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर लेंगरे यांनीही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संबंधी मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमास जे.एस.पी. एम.संस्थेच्या भगवंत इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रमुख संचालक श्री.ऋतुराज सावंत व याच महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजीत शिराळ,माढा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील हेलकर,बार्शी येथील बी.एड.महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रेय कदम, कार्यक्रमाचे संयोजक डॉ.रत्नाकर साखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. संजय माने व श्री विठ्ठल जगताप तसेच विविध विद्यापीठातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे २०० पेक्षा अधिक संस्था चालक,प्राचार्य, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.